डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष २ रे, अंक २ रा, जून-२०२६

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन विभाग

पशुधन हितायः बहुजन सुखायः



डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष २ रे, अंक २ रा, जून-२०२६

**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११०६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-४११०६७

**वृत्तसंपादक**

**श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,**
'महापशुधन वार्ता' कक्ष,
जनसंपर्क अधिकारी
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**मुख्य संपादक**
**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११०६७**




मागील अंक वाचण्यासाठी
dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

# महापशुधन वार्ता




**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनांची माहिती मिळवण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा.**

**राज्यस्तरीय योजना**

**जिल्हास्तरीय योजना**

## या अंकात...


- एआय, मानवी संवेदना व पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट: **मंत्री पंकजा मुंडे**
- ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी पंकजा मुंडे यांनी घेतला विभागाचा सखोल आढावा
- वसुंधरा रक्षक अभियान
- ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी पंकजा मुंडे यांनी घेतला विभागाचा सखोल आढावा
- मुंबईत ५८ कोटींचे भव्य पशु मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
- पंकजा मुंडे यांच्याकडून वरवटी येथील 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे गौरक्षण शाळे'ची पाहणी
- बोव्हाईन ब्रिडींग ऍक्टची प्रभावी अंमलबजावणी करा: मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचे निर्देश
- पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्याकडून कोंडीग्रे येथील 'राजस्थानी गोशाळे'ची पाहणी
- मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडून खडकी येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेची पाहणी
- पशुसंवर्धन आयुक्तालयात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची बैठक संपन्न
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, बोंद्री येथे डॉ. शितलकुमार मुकणे यांच्याकडून कामकाजाचा आढावा
- १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट द्वारे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण
- खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी कामाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे आवश्यक: मा. आयुक्त पशुसंवर्धन
- जिल्हा परिषद कोल्हापूरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांची जिल्हा पशूसर्वचिकित्सकालयास भेट
- देवणी : जिल्हास्तरीय भव्य पशुप्रदर्शन ; शेतकऱ्यांचा प्रतिसाद
- राज्यभरात पशुसंवर्धन दिन उत्साहात साजरा
- मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना: महाडीबीटी पोर्टलचे काम पूर्ण होताच ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला प्रारंभ
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष पशुपालक मार्गदर्शन व आरोग्य शिबिर
- मोफत लसीकरण व जंतनाशक शिबिराचे आयोजन
- 'पशुपालक ते पशुउद्योजक' प्रशिक्षणाचा समारोप

**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनांची माहिती मिळवण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा.**

**राज्यस्तरीय योजना**

**जिल्हास्तरीय योजना**

## या अंकात...


- कृषि विज्ञान केंद्र कांचनपूर: 'गाय व म्हैस पालन प्रशिक्षण' संपन्न
- 'मेगा स्वीट ज्वार' चारा पिकाची १३ फुटांपर्यंत विक्रमी वाढ
- डॉ. के. संपतकुमार यांची पोहरा शासकीय पशुपैदास प्रक्षेत्राला भेट
- यशकथा: महामेष योजनेतून राजू थोटे यांनी साधली प्रगती
- लहान वय, मोठी जिद्द: कोंबडी पालनातून उभं राहतंय एक स्वप्न
- वणीत उष्माघाताने व्याकुळ झालेल्या अजगरावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे यशस्वी उपचार
- उष्माघाताने व्याकुळ झालेल्या दोन रोहींवर यशस्वी उपचार
- करडावर पोटाच्या हर्नियाची क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वी
- पशुवैद्यक: अन्नसुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक
- लसीकरण कशासाठी?
- शेळीतील पैदास व्यवस्थापन
- मराठवाड्याची शान : जाणवळ पश्मी श्वान
- पशु वन औषधी - वनस्पती उद्यान : जिवंत ग्रंथालय
- जागतिक तापमानवाढ, दुभत्या गायींवरील ताण: आव्हाने व उपाय
- संस्था परिचय: खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर (पुणे)
- पशुसंवर्धनाची बाराखडी
- गृहविभाग (जनजागृती): गोवंश अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध




# एआय, मानवी संवेदना व पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट – मंत्री पंकजा मुंडे

## पशुपालक-शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीवर राज्य शासनाचा भर



**मुंबई, :** कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना व पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून राज्यातील पशुपालन व्यवसायाला भरभराटी आणावी, असे आवाहन मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांनी केले.

'कारगिल' कंपनीने 'सिंजेंटा फाउंडेशन इंडिया' व 'डिजिटल ग्रीन इंडिया' यांच्या भागीदारीत अहिल्यानगर जिल्ह्यात 'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रम' सुरू केला आहे. मंत्रालयात आयोजित या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात श्रीमती पंकजा मुंडे बोलत होत्या.

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, कारगिल इंडियाचे अध्यक्ष व कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन ॲंड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन, डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन व सिंजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे आदी या कार्यक्रमास उपस्थित होते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातून पशुपालक - शेतकरी व इतर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती ऑनलाइन पद्धतीने कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.



श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कारगिल, सिंजेंटा फाउंडेशन व डिजिटल ग्रीन यांचा हा संयुक्त उपक्रम आपल्या 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला गती देणारा ठरेल. तंत्रज्ञान, 'फार्मरचॅट'सारखे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल मार्गदर्शन आणि थेट दारात पोहोचणारी 'पशू आरोग्य मित्र' फिरती पशुवैद्यकीय सेवा यांच्या माध्यमातून अहिल्यानगरमधील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. 'पशू सखी'च्या माध्यमातून महिलांचा वाढणारा सहभाग ग्रामीण महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देईल. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वासही श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला आहे.


## क्षमता बांधणी प्रशिक्षण

अहिल्यानगरमधील राहुरी, राहता व श्रीरामपूर तालुक्यातील २६ गावांमधील ३ हजाराहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत 'पशू आरोग्य मित्र' (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा पोहोचवली जात आहे. याशिवाय, १२० गावांमधील ५ हजार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सल्ला सेवा व क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दोन फिरते पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या वाहनांमध्ये आधुनिक निदान साधने, औषधे व लसींसाठी कोल्ड-चेन सुविधा उपलब्ध असेल. यामुळे थेट शेतकऱ्यांच्या दारात वेळेवर उपचार मिळून जनावरांचा मृत्यूदर कमी होण्यास मदत होणार आहे. 'डिजिटल ग्रीन' द्वारे 'पशू सखी' आणि पॅरा-व्हेट्सना मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षित केले जाईल, जे गावोगावी जाऊन पशुपोषण, वासरांची काळजी, स्वच्छता व दुग्ध व्यवस्थापनाचे धडे देतील. शेतकऱ्यांसाठी फार्मरचॅट हे एआय-संचलित, आवाज आधारित प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आले आहे, जे स्थानिक भाषेत जनावरांचे आजार व सरकारी योजनांची माहिती देईल, असे संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

कारगिल इंडियाचे अध्यक्ष व कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन म्हणाले की, महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेशी पशुसंवर्धन जोडलेले आहे. 'कारगिल' अनेक वर्षांपासून येथील शेतकऱ्यांसोबत काम करत असून, या नव्या उपक्रमामुळे दुग्धव्यवसाय परिसंस्था अधिक मजबूत होईल.

डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन व सिंजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे यांनीही या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त करत, हा प्रकल्प शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी व हवामान-अनुकूल शेतीला चालना देण्यासाठी सहाय्यकारी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.






## 'वसुंधरा रक्षक'!

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त (०५ जून) एक अत्यंत स्तुत्य व काळाची पाऊलओळख असणारे 'वसुंधरा रक्षक अभियान' सुरू करण्यात आले आहे. या अभियानाबाबत माहिती देताना राज्याच्या मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले की, या मोहिमेत एक विशेष बारकोड देण्यात आला आहे. हा बारकोड स्कॅन करून आपल्यापैकी प्रत्येक नागरिकाला अधिकृतपणे 'वसुंधरा रक्षक' म्हणून या चळवळीत सहभागी होता येणार आहे. आपण ज्या भागात राहतो, तिथल्या निसर्गाचे, झाडांचे व पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या गोष्टींचे मनोभावे जतन करणे. जिथे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे किंवा निसर्गाचे रक्षण होत नाही असे दिसेल, तिथे एक सजग नागरिक म्हणून त्याविरोधात आवाज उठवणे याबाबत सदर अभियानातून जनजागृती करण्यात येत आहे. वसुंधरा रक्षक अभियानात सहभागी होत मार्गदर्शनासाठी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांना मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी निमंत्रित केले.

# ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी पंकजा मुंडे यांनी घेतला विभागाचा सखोल आढावा

## रिक्त पदांची भरती व नवीन योजना गतीने राबविण्याचे निर्देश




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुसंवर्धन क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पशुसंवर्धन विभागाची सविस्तर आढावा बैठक दि. २२ मे २०२६ रोजी मंत्रालय येथे मा. मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पशुसंवर्धनाला 'कृषी दर्जा' मिळाल्यानंतरच्या पुढील कार्यवाहीसह, नवीन योजनांची अंमलबजावणी व विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांना गतिमान कामाचे निर्देश देण्यात आले.




पशुसंवर्धन क्षेत्राला नुकताच 'कृषी क्षेत्राचा दर्जा' बहाल करण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर पशुपालकांना व शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राप्रमाणेच विविध सवलती, कर्ज आणि योजनांचा लाभ मिळणे सुलभ झाले आहे. या निर्णयाची तळागाळातील पशुपालकांपर्यंत प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, तसेच तांत्रिक व प्रशासकीय अडचणी कशा दूर करता येतील, याचा सखोल आढावा या बैठकीत घेण्यात आला. यामुळे ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनाला मोठी चालना मिळणार आहे.

ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बळकटीकरण, फिरते पशुवैद्यकीय दवाखाने व जनावरांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास करणे यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. शासनाच्या नवीन योजनांची अंमलबजावणी थेट लाभार्थ्यांपर्यंत विनाविलंब पोहोचवण्यासाठी यंत्रणेने अधिक तत्परतेने काम करावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

**रिक्त पदांची भरती होणार**

पशुसंवर्धन विभागाचे कामकाज अधिक प्रभावीपणे चालवण्यासाठी व पशुपालकांना वेळेत सेवा मिळण्यासाठी विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदांचा आढावा घेऊन भरती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व ग्रामीण स्तरावर पशुवैद्यकीय सेवांचा दर्जा सुधारेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी द्यायची असेल तर पशुपालन क्षेत्राचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. 'कृषी दर्जा' मिळाल्यामुळे या क्षेत्राला नवे बळ मिळाले असून, सर्व योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व वेगवान पद्धतीने करण्याचे निर्देश मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.



**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे :**

- पशुपालकांचे उत्पन्न वाढवून ग्रामीण भागातील आर्थिक चित्र बदलण्यावर भर.
- नवीन शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे.
- पशुवैद्यकीय दवाखाने व उपचारांच्या सुविधा आधुनिक करणे.
- रिक्त पदांची भरती करून विभागाच्या कामकाजाला गती देणे.

"पशुसंवर्धनाला 'कृषी क्षेत्राचा दर्जा' मिळाल्यामुळे आता आमचे पशुपालक व शेतकरी खऱ्या अर्थाने सक्षम होतील. केवळ योजना कागदावर न राहता, त्या शेवटच्या घटकांपर्यंत गतीने पोहोचवणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. विभागातील रिक्त पदे तातडीने भरून प्रशासकीय कामाला गती देण्याचे व ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा अधिकधीक सक्षम व आधुनिक करण्याचे निर्देश मी दिले आहेत. हा विभाग केवळ एक शासकीय विभाग न राहता, ग्रामीण भागातील प्रत्येक घराचा आर्थिक आधारस्तंभ बनेल, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

**श्रीमती पंकजा मुंडे,**

मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य

# मुंबईत 58 कोटींचे भव्य पशु मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

## मंत्री पंकजा मुंडे व आशिष शेलार यांच्या हस्ते भूमीपूजन



**मुंबई:** 'मल्टिस्पेशालिटी वेटर्नरी हॉस्पिटलचे'चे भूमीपूजन करताना मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे आणि माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आशिष शेलार. समवेत जोगेश्वरी पूर्वचे आमदार अनंत नर, 'महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर॰ चे मा. कुलगूरू डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये व सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश इंगोले आदी.

**मुंबई:** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव संकुल परिसरात जिल्हा नियोजन विकास समितीच्या (डीपीडीसी) माध्यमातून तब्बल ५८ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या भव्य 'मल्टिस्पेशालिटी वेटर्नरी हॉस्पिटलचे'चे भूमीपूजन दि. १० मे २०२६ रोजी संपन्न झाले. मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे आणि माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आशिष शेलार यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला.

भूमीपूजनप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, 'पशुसंवर्धन विभागाची मंत्री म्हणून काम करताना मला अतिशय आनंद होत आहे. मुक्या पशुधनासाठी काम करण्याची मिळालेली संधी मी माझे भाग्य समजते. केवळ भव्य हॉस्पिटल उभारून न थांबता, प्राण्यांच्या विविध आजारांवर आणि वैद्यकीय क्षेत्रातील वेगवेगळ्या संशोधनावर भर देण्याची गरज आहे. तसेच पशुसंवर्धन विभागाला प्रगतीपथावर नेण्यासाठी भविष्यात सातत्यपूर्ण प्रयत्न असतील', अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यांप्रसंगी जोगेश्वरी पूर्वचे आमदार अनंत नर, 'महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर' चे कुलगुरू मा. डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये व सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच भाजपचे जिल्हाध्यक्ष ज्ञानमूर्ती शर्मा, नगरसेवक जितेंद्र वळवी आणि इतर मान्यवर व पशुवैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते.







# पंकजा मुंडे यांच्याकडून वरवटी येथील 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे गौरक्षण शाळे'ची पाहणी



**अंबाजोगाई (जि. बीड):** तालुक्यातील वरवटी येथील 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे गौरक्षण शाळे'ला नुकतीच मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी गौशाळेत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर पाहणी केली. श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी गाईच्या शेणापासून आणि गोमूत्रापासून तयार करण्यात येणाऱ्या विविध सेंद्रिय व उपयुक्त उत्पादनांची माहिती घेतली. तसेच, पर्यावरणाला पूरक ठरणाऱ्या 'गोकाष्ठ निर्मिती यंत्र' या आधुनिक सामग्रीचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. गौशाळेचे संचालक श्री. अशोक मुंडे यांच्या कार्याचा गौरव करताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, 'श्री. अशोक मुंडे हे अत्यंत सेवाभावाने या गौशाळेचे संचलन करत आहेत. त्यांची ही निस्सीम सेवावृत्ती आणि गोवंश रक्षणासाठीचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. त्यांच्या या कामाचा इतरांनी आदर्श घ्यावा.'





महापशुधन वार्ता

# बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करा: मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचे निर्देश



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-४११०६७**

राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने “महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३” लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत.

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३

## दंड व शिक्षेच्या तरतुदी :

1. कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर **रु. ५०,०००/-** पर्यंत दंड आकारण्यात येईल.

2. नोंदणी प्रमाणपत्राविना गोजातीय प्रजनन क्रिया करणे, अथवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर **रु. १,००,०००/-** पर्यंत दंड आकारण्यात येईल.

3. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची / दिशाभूल करणारी जाहिरात किंवा प्रसिद्धी केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर ६ महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा **रु. २,००,०००/-** पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## शेतकऱ्यांसाठी महत्वाचे:

- फक्त प्रमाणित व अधिकृत रेत मात्रांचाच वापर करा
- सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासा व नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्या.
- कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून आपल्या पशुधनाचे संरक्षण करा.

## शेतकऱ्यांना होणारे फायदे:

- सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन
- उत्तम प्रजनन कार्यक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढ
- वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास
- दुग्ध व्यवसायात स्थैर्य व आर्थिक उत्पन्नात वाढ

**वैज्ञानिक प्रजनन... समृद्ध पशुधन...**
**समृद्ध शेतकरी... समृद्ध महाराष्ट्र!**

# पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्याकडून कोंडीग्रे येथील 'राजस्थानी गोशाळे'ची पाहणी



**हातकणंगले (कोल्हापुर) :** तालुक्यातील कोंडीग्रे येथील 'राजस्थानी गोशाळे'ला मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी गोशाळेतील विविध प्रकल्पांची बारकाईने पाहणी करून व्यवस्थापन समिती व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी गोशाळेतील पशुधनाच्या आरोग्याची व त्यांच्या देखभालीची माहिती घेतली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी करण्यात आलेली पाण्याचे नियोजन, हिरवा व सुका चारा तसेच सकस खाद्य व्यवस्थापन या बाबींची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. गोशाळेतील पशुधनाला दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

गोशाळेच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या 'कंपोस्ट खत प्रकल्पा'ची आयुक्तांनी विशेष पाहणी केली. शेणाचा व गोमूत्राचा कल्पकतेने वापर करून सेंद्रिय खत निर्मितीच्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. पशुपालनातून व गोशाळा व्यवस्थापनातून अशा पूरक व शाश्वत प्रकल्पांची निर्मिती कशी फायदेशीर ठरू शकते, याबाबत त्यांनी उपस्थितांशी चर्चा केली.

या भेटीदरम्यान डॉ. किरण पाटील यांनी गोशाळा व्यवस्थापन कमिटीच्या सदस्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच, पशुसंवर्धन विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांना गोशाळांना तांत्रिक व वैद्यकीय साहाय्य वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गोशाळा कशा स्वावलंबी बनवता येतील, याविषयी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांचेकडून खडकी येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेची पाहणी

## पशुपालकांसाठी गुणवत्तापूर्ण व अत्याधुनिक सेवा उपलब्ध होण्यास होणार मदत



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

खडकी (पुणे) येथील शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र, खडकी येथे मंगळवार, दि. १२ मे २०२६ रोजी मा. आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. शितलकुमार मुकणे यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' अंतर्गत पुनर्निर्माण करण्यात आलेल्या अत्याधुनिक प्रयोगशाळेची मान्यवरांनी पाहणी केली.

गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र विभागीय व्यवस्थापक डॉ. उदय भोसले यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान मान्यवरांनी केंद्रातील विविध विभागांची पाहणी केली. प्रयोगशाळेतील नवीन आधुनिक सुविधा, गुणवत्ता नियंत्रण प्रणाली व गोठित रेतमात्रा निर्मितीच्या सुधारित प्रक्रियेबाबत डॉ. भोसले यांनी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी पशुसंवर्धन विभागातील वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.



## शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र, खडकी, पुणे

**सदर केंद्रामार्फत राज्यातील 10 जिल्ह्यांना गोठित रेतमात्रांचा पुरवठा केला जातो. केंद्रात उच्च जनुकीय प्रजनन मूल्य (High Genomic Breeding Value) असलेले उत्कृष्ट वंशावळीचे प्रजनन वळू संगोपनाखाली ठेवण्यात आले असून त्यांच्यापासून उच्च गुणवत्तेच्या गोठित रेतमात्रांची निर्मिती केली जाते. तयार करण्यात येणाऱ्या प्रत्येक गोठित रेतमात्रेची विविध गुणवत्ता नियंत्रण निकषांनुसार काटेकोर तपासणी करण्यात येते. मान्यवरांनी अत्याधुनिक उपकरणे व प्रयोगशाळेची पाहणी करून कार्यपद्धतीचे कौतुक केले.**

## ... ही प्रयोगशाळा ठरेल मैलाचा दगड!

मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी नमूद केले की, मा. सचिव महोदयांच्या मार्गदर्शनाखाली या प्रयोगशाळेचे यशस्वीरीत्या पुनर्निर्माण करण्यात आले आहे. या आधुनिक सुविधामुळे राज्यातील पशुपालकांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक सेवा वेळेत उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. 'राष्ट्रीय गोकुळ मिशन'च्या माध्यमातून उच्च उत्पादनक्षम पशुधनाच्या रेतमात्रा व त्याद्वारे गुणात्मक पशुधनाची पैदास करण्यासाठी ही प्रयोगशाळा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही मा. आयुक्त महोदयांनी व्यक्त केला.

# पशुसंवर्धन आयुक्तालयात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची बैठक संपन्न




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

पशुसंवर्धन आयुक्तालय (पुणे) येथे मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची महत्त्वाची आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत कुक्कुटपालन व्यवसायातील सद्यस्थिती, कायदेशीर नियम आणि व्यावसायिकांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे अनिल खामकर, डॉ. प्रसन्न पेडगावकर, शुभम महल्ले, धनंजय डांगे, विलास साळवी, सुदर्शन पोकळे, विठ्ठल चौधरी, शरद मोडांबे आदींसह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्य सरकारने पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी क्षेत्राचा दर्जा बहाल केल्यामुळे आता पोल्ट्री व्यावसायिकांना शेतीसाठी मिळणाऱ्या सवलतींचा थेट फायदा होणार आहे. या अंतर्गत वीज बिलात सवलत मिळवण्यासाठी राज्यातील ९० हजार लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यात आली होती. त्यापैकी अचूक तपशील सादर करणाऱ्या ६३ हजार व्यावसायिकांची माहिती पशुसंवर्धन विभागाने महावितरणकडे वर्ग केली आहे. उर्वरित व्यावसायिकांनी अचूक ग्राहक क्रमांकासह माहिती जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे कार्यालयाकडे तातडीने सादर करावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी या बैठकीत केले.



कुक्कुटपालनासाठी वापरण्यात येणाऱ्या पक्षी खाद्याच्या बॅगवर त्यातील अंतर्गत घटकांची स्पष्ट नोंद असण्याबाबतच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या व्यवसायात पारदर्शकता आणण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, यावर सविस्तर चर्चा झाली. कंत्राटी कुक्कुटपालन करताना अनेक कंपन्यांकडून दरवेळी ग्रामपंचायतीचे नवीन 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) मागितले जाते. यामध्ये शेतकऱ्यांचा मोठा वेळ वाया जातो. त्यामुळे एकदा मिळालेले प्रमाणपत्र पुढील करारांसाठी ग्राह्य धरावे, अशी मागणी समिती सदस्यांनी केली. ग्रामपंचायत कर आकारणीबाबत आयुक्तांनी ग्रामविकास विभागाकडे सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन कुक्कुट व्यावसायिकांना दिले. शासनाच्या विविध योजना व सवलतींचा लाभ घेण्यासाठी राज्यातील सर्व कुक्कुटपालकांनी आपापल्या जिल्ह्याच्या 'पशुसंवर्धन उपआयुक्त' कार्यालयात अधिकृत नोंदणी करण्याचे आवाहनही या बैठकीत मा. आयुक्तांनी केले.

सदर बैठकीत वीजदर सवलतीसह साथरोग प्रचार-प्रसिद्धी, प्रतिबंधात्मक लसीकरण, खाद्य विश्लेषण व दर्जा नियंत्रण, तसेच पशुसंवर्धनविषयक 'किसान क्रेडिट कार्ड' अंतर्गत मिळणारे अर्थसाहाय्य यावरही सविस्तर मंथन झाले. या सर्व विषयांवर पशुसंवर्धन विभागामार्फत लवकरच सकारात्मक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही आयुक्तांनी दिली.

**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेबाबत चर्चा**

राज्य सरकारने जाहिर केलेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतील कुक्कुटपालनास चालना देणाऱ्या योजनांविषयी या बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीच्या सदस्यांनी या योजनेविषयी आपले अनुकूल अभिप्राय सादर करत या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी समिती शासनासोबत काम करेल, असा विश्वास व्यक्त केला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, बोंद्री येथे डॉ. शितलकुमार मुकणे यांच्याकडून कामकाजाचा आढावा



**रामटेक (नागपूर):** पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे यांनी नुकतीच रामटेक तालुक्यातील बोंद्री येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्राला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रक्षेत्रावरील विविध विभागांची पाहणी करत एकूण कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

प्रक्षेत्रावरील मेंढ्या व शेळ्यांच्या आरोग्याची काळजी, त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या चाऱ्याचे नियोजन, व विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी यावर त्यांनी विशेष भर दिला. ग्रामीण भागातील पशुपालकांना दर्जेदार जातीचे पशुधन उपलब्ध करून देणे व त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळाच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असल्याचे डॉ. मुकणे यावेळी म्हणाले.

"ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी शेळी-मेंढी पालन हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. बोंद्री प्रक्षेत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च उत्पादनक्षम पशुधनाचा पुरवठा अधिक प्रभावीपणे व्हावा, हाच आमचा प्राधान्यक्रम आहे. त्यासाठी महामंडळ कटीबद्ध आहे."

**डॉ. शितलकुमार मुकणे**

(व्यवस्थापकीय संचालक, पु. अ.मे. व शे. वि. महामंडळ)

महापशुधन वार्ता

# 1962 हेल्पलाइन व व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट द्वारे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

गेल्या पाच वर्षांत, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक (सीएसआर निधीतून) व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या **१९६२** या टोल-फ्री हेल्पलाइनने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे बळकट केले आहे. 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमाने विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळे पशुधनाची वेळेवर, सुलभ व विश्वासार्ह काळजी घेणे शक्य झाले आहे.

या उपक्रमाच्या यशानंतर, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (इंडसइंड बँक) व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सेवा अधिक गतिमान करण्यासाठी 'व्हॉट्सअ‍ॅप-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळवणे सोपे करणे, संवाद सुलभ करणे व रिअल-टाइम (तात्काळ) पशुवैद्यकीय साहाय्य प्रदान करणे हा आहे.

## व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सेवा

शेतकरी +९१ ९०६३१४२२९९ या क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठवून किंवा निश्चित केलेला क्यूआर (QR) कोड स्कॅन करून या चॅटबॉट सेवेचा लाभ घेऊ शकतात. शेतकऱ्यांना त्यांच्या घरातूनच, व्हॉट्सअ‍ॅपच्या अत्यंत सोप्या व वापरण्यास सुलभ इंटरफेसचा वापर करून जलद व सोयीस्कर पशुवैद्यकीय सल्ला आणि सेवा मिळाव्यात, अशा पद्धतीने हा चॅटबॉट डिझाइन करण्यात आला आहे.

महापशुधन वार्ता

पशुवैद्यकीय चॅटबॉट सेवेसाठी क्युआर (QR) को ड स्कॅन करा:

## व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा कसे काम करते?

+९१ ९०६३१४२२९९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर "Hi" पाठवून खालील सेवा मिळवू शकतात:

- पशुधनाचे आजार, उपचार व लसीकरणाबाबत माहिती मिळवणे.
- पशुसंवर्धन व सरकारी योजनांची सविस्तर माहिती मिळवणे.

खालील माध्यमांद्वारे पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधणे:

- चॅट (Chat)
- ऑडिओ कन्सल्टेशन (व्हॉईस कॉल सल्ला)
- व्हिडिओ कन्सल्टेशन/ टेलिकन्सल्टेशन (व्हिडिओ कॉल सल्ला)

## प्रमुख वैशिष्ट्ये

- पशुवैद्यकीय टेलिकन्सल्टेशन (दूरस्थ सल्ला) सेवा
- ऑडिओ व व्हिडिओ कॉलद्वारे सल्ल्याची सोय
- पशुवैद्यकीय डॉक्टरांशी थेट संवाद
- रुग्णालय व पशुवैद्यकीय सेवा डिरेक्टरीची उपलब्धता
- सरकारी योजनांची माहिती
- वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

## प्रागतिक माहिती (ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६)

- ६१५ शेतकऱ्यांनी चॅटबॉटचा वापर करून संवाद साधला.
- २०१ व्हिडिओ कन्सल्टेशन (व्हिडिओ कॉलद्वारे सल्ला) यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

## उपक्रमाची उद्दिष्टे

- पशुवैद्यकीय सेवा वितरणाची यंत्रणा बळकट करणे.
- शेतकऱ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन वेळेत उपलब्ध करून देणे.
- डिजिटल सुलभता वाढवणे आणि सेवांचा विस्तार करणे.
- तात्काळ संवाद व जलद प्रतिसाद यंत्रणा सक्षम करणे.

## शेतकऱ्यांना होणारे फायदे

- प्रवास न करता घरबसल्या पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता.
- पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद.
- सरकारी योजना व त्यांच्या फायद्यांविषयी जागरूकतेत वाढ.
- सेवा मिळवण्यासाठी लागणारा वेळ व खर्चात बचत.
- पशुधनाचे आरोग्य व उत्पादकतेत सुधारणा.

## पशुवैद्यकीय सेवा आता फक्त एका कॉल वर




“हा उपक्रम शेतकऱ्यांना डिजिटलदृष्ट्या सक्षम करण्यासाठी व संपूर्ण राज्यात कार्यक्षम, सुलभ आणि तंत्रज्ञान-आधारित पशुवैद्यकीय आरोग्य सेवा सुनिश्चित करण्यासाठी BFIL आणि पशुसंवर्धन विभाग परिश्रमपूर्वक कार्यरत आहे. पशुपालकांना तात्काळ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, या उद्दिष्टाला पशुसंवर्धन विभागाने प्राथमिकता दिली असून, पशुपालक व शेतकरी बांधवांनी 1962 या कॉलसेंटर सेवेचा अधिकाधीक लाभ घ्यावा.”

डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य

# खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी केलेल्या कामाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे आवश्यक: मा. आयुक्त पशुसंवर्धन

## 'गोजातीय प्रजनन व नियमन' विषयावर कार्यशाळा संपन्न



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे:**

राज्यातील खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी केलेल्या कामाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून राज्यातील पशुवैद्यकीय सेवेची संख्यात्मक माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार असून, त्यामुळे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचा दर्जा व गुणवत्ता आणखी वृद्धींगत होण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले.

औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू हॉल येथे 'गोजातीय प्रजनन व नियमन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मा. आयुक्त पशुसंवर्धन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन व नियमन प्राधिकरण डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत विविध तज्ज्ञ अधिकारी, सेवा पुरवठादार आणि संस्थात्मक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन कायदा व नियमांची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. यासोबतच कृत्रिम रेतन (AI) सेवा आणि नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन (NDLM) अंतर्गत डिजिटल ट्रॅकिंगच्या तांत्रिक एकत्रीकरणावर तसेच राज्य व केंद्र सरकारच्या भविष्यकालीन धोरणांवर कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य डॉ. देवेंद्र जाधव यांच्या प्रास्ताविकाने झाली.




डॉ. किरण पाटील यांनी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन कायदा व नियमांची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कृत्रिम रेतन सेवा आणि NDLM डिजिटल ट्रॅकिंग आवश्यक असल्याने या तांत्रिक बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. राज्यामध्ये उच्च उत्पादनक्षम पशुधनाच्या संख्यात्मक वाढीसाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी कृत्रिम रेतनाच्या कार्यात अधिकधीक पारदर्शकता निर्माण करणे आवश्यक आहे. खाजगी कृत्रिम सेवादातांनी याकरिता पशुसंवर्धन विभागाच्या सोबतीने काम केले पाहिजे. या कामात खाजगी कृत्रिम सेवादातांना पशुसंवर्धन विभाग सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासनही उपस्थितांना डॉ. किरण पाटील यांनी दिले.

### तज्ज्ञांचे सादरीकरण आणि तांत्रिक सत्र

कार्यशाळेच्या उत्तरार्धात विविध संस्थांच्या तज्ज्ञांनी आपले अनुभव आणि तंत्रज्ञान याविषयी सादरीकरण केले. बायफ, पुणे येथील डॉ. जयंत खडसे यांनी गोजातीय पैदाशीतील बायफच्या अनुभवांवर प्रकाश टाकला. चितळे-ABS जेनस प्रा. लि. चे डॉ. परिक्षित देशमुख यांनी 'जेनोमिक्स आणि सेक्स्ड सीमेन' या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून गोवंश उत्पादकता व पैदास कशी सुधारावी, याबद्दल तांत्रिक माहिती दिली.

भारत पशुधन प्रणालीची उपयोगिता व वापर याबाबत सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजू कोलते यांनी उपस्थित खाजगी कृत्रिम सेवादात्यांना मार्गदर्शन केले. तांत्रिक सत्रानंतर उपस्थित सर्व प्रतिनिधी व अधिकाऱ्यांमध्ये खुली चर्चा होऊन विविध मुद्द्यांवर अभिप्राय घेण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तथा, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाचे सदस्य सचिव डॉ. प्रशांत भड यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाला.



**परभणी** जिल्ह्यातील एमबीबीआरए अंतर्गत नोंदणी प्राप्त झालेले खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञ यांचेसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा परिषद सभागृह परभणी येथे आयोजित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. मनोज घाटे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र डॉ. कादरी व सहाय्यक आयुक्त डॉ. प्रिया धृतराज व डॉ.दिप्ती कच्छवे यांनी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण व हँड ऑन ट्रेनिंग दिले.




**गडचिरोली,** दि. ०२ जून २०२६ रोजी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. अध्यक्ष म्हणून प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर विभाग नागपूर, मा. डॉ. सतीश राजू, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, गडचिरोली डॉ. सुधीर मठवाले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पंचायत समिती (सर्व ), पशुधन विकास अधिकारी (सर्व) उपस्थित होते.




**बारामती** येथे खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता कार्यशाळा डॉ. समीर बोरकर (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पुणे विभाग, पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजेश वासनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.



जिल्हास्तरीय बँकर्स समिती (DLBC) बैठकीत उपस्थित सर्व बँकर्सना 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने' ची माहिती देऊन पात्र पशुपालकांना कर्जपुरवठा करण्यासाठी बँकांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन यावेळी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने अधिकाऱ्यांनी केले.

**बुलढाणा:** जिल्हास्तरीय बँकर्स समिती (DLBC) बैठकीत उपस्थित सर्व बँकर्सना कृषी विभागाच्या ४% व्याजदर सवलत शासन निर्णयाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच KCC (किसान क्रेडिट कार्ड) अंतर्गत नवीन अर्जांचे नमुने बँकांना वितरित करून, सादर होणाऱ्या प्रस्तावांवर सकारात्मक विचार करत जास्तीत जास्त कर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आली.



**अकोले (जि. अहिल्यानगर):** श्री. अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्टच्या दुग्धव्यवसाय कार्यशाळेला पशुपालकांचा उत्स्फूर्त मिळाला.३१ मे रोजी आयोजित 'फायद्याचा दुग्धव्यवसाय' कार्यशाळेत २०० हून अधिक पशुपालक उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित पशुपालकांना दुग्धव्यवसायातील विविध तांत्रिक विषयांवर, तसेच शासनाच्या नवीन योजना, KCC (किसान क्रेडिट कार्ड), Sex Sorted Semen (लिंग वर्गीकृत रेत) उपलब्धता आणि कृषी दर्जा (४% व्याजदर सवलत शासन निर्णय) याबाबत सविस्तर व मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.



**नागपूर:** पशुसंवर्धन विभागामार्फत अधिकारी व खाजगी AI वर्कर्ससाठी विशेष प्रशिक्षण  कार्यशाळेचे आयोजन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नितीन फुके यांच्या प्रमुख उपस्थितीत व सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीराम आणि डॉ. मालापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

# जिल्हा परिषद कोल्हापूरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांची जिल्हा पशूसर्वचिकिस्तकालयास भेट




**कोल्हापूर:** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. जॅसमिन यांनी नुकतीच जिल्हा पशूसर्वचिकिस्तकालय व विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळेला भेट देऊन कामकाजाची सविस्तर पाहणी केली.

या भेटीप्रसंगी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रमोद बाबर, जिल्हा पशूसर्वचिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. सॅम लुद्रीक, मुख्यालय सहाय्यक आयुक्त डॉ. महेश शेजाळ व गोकुळ दूध संघाचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कामत यांची प्रमुख उपस्थिती होती.विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळेतील पाहणी दरम्यान त्यांनी पशुधनातील वाढत्या आजारांवर चर्चा केली. विशेषतः पशुधनाच्या उपचारात प्रतिजैविकांचा (Antibiotics) वापर मर्यादित असावा, यावर त्यांनी भर दिला. प्रतिजैविकांच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, या विषयावर पशुपालकांमध्ये व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी विभागाला दिले.

**कामाचे कौतुक व सूचना:**

डॉ. जॅसमिन यांनी चिकिस्तलयातील वाढती बाह्यरुग्ण संख्या व यशस्वीपणे पार पडत असलेल्या विविध शस्त्रक्रियांच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले. मोठ्या पशुधनांवरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक सुलभ व्हाव्यात, यासाठी तातडीने अत्याधुनिक व सर्व सोयींनी सुसज्ज असा स्वतंत्र 'शस्त्रक्रिया कक्ष' उभारण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचित केले.

भेटीदरम्यान डॉ. जॅसमिन यांनी उपस्थित पशुपालकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पशुधनाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका व शासकीय योजनांचा लाभ घ्या, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या भेटीमुळे भविष्यात अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त केंद्र म्हणून हे रुग्णालय विकसित होईल, असा विश्वास पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# देवणी : जिल्हास्तरीय भव्य पशुप्रदर्शन ; शेतकऱ्यांचा प्रतिसाद



**देवणी (जि. लातूर):** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद लातूर, नगरपंचायत देवणी आणि श्री ग्रामदैवत महादेव मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने देवणी येथे नुकतेच जिल्हास्तरीय भव्य पशुप्रदर्शन उत्साहात पार पडले. जिल्हाभरातील पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून पंचायत समितीच्या सभापती श्रीमती अंकिता पाटील, तर अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष श्रीमती कीर्ती घोरपडे उपस्थित होत्या.

यावेळी ज्येष्ठ पशुतज्ज्ञ तथा माफसूचे माजी शिक्षण विस्तार संचालक आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. अनिल भिकाने यांनी पशुपालकांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, देवणी गोवंश हा लातूर जिल्ह्याचा अभिमान असून बदलत्या कृषी यांत्रिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर या गोवंशाचे जतन व संवर्धन अत्यावश्यक आहे. देवणी गाईंची निवड प्रक्रिया, सेक्स-सॉर्टेड सीमेन आणि आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या मदतीने दूध उत्पादन क्षमता वाढवून परवडणाऱ्या वंशावळी विकसित करण्यासाठी शेतकरी, पशुवैद्यक आणि शास्त्रज्ञांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच १ एप्रिलपासून सुरू झालेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेचा लाभ घेऊन उत्कृष्ट दुध देणाऱ्या देवणी गाईंचे लघु गोठे उभारण्याचे आवाहन त्यांनी केले. या प्रदर्शनात देवणी गोवंश, लाल कंधारी गोवंश, संकरित गोवंश, उच्च प्रतीच्या शेळ्या, कुक्कुट पक्षी तसेच विविध जातींच्या श्वानांचा समावेश होता. सहभागी जनावरांचे शरीरबांधा, निगा, आरोग्य आणि दूध उत्पादन क्षमता या निकषांवर परीक्षण करण्यात आले. उत्कृष्ट जनावरांचे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथील तज्ञ प्राध्यापकांची टीम डॉ. गंगाप्रकाश चन्ना यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षक म्हणून उपस्थित होती. त्यांनी विविध गटांतील विजेत्यांची निवड केली. विजेत्या पशुपालकांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमादरम्यान पशुपालकांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यात पशुरोग प्रतिबंध, संतुलित आहार व्यवस्थापन, कृत्रिम रेतन व प्रजनन तंत्रज्ञान याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रास्ताविक डॉ. बळवंत शिंदे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन औसा यांनी केले. आभार प्रदर्शन श्री अजीज शेख यांनी केले.

# राज्यभरात पशुसंवर्धन दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या स्थापनेला यंदा तब्बल १३४ वर्षे पूर्ण होत असल्याने, या ऐतिहासिक पर्वानिमित्त राज्यभरात पशुसंवर्धन दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या आवाहनानुसार राज्यातील सर्व जिल्हे, तालुके तसेच पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रात विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

२० मे १८९२ रोजी स्थापन झालेल्या पशुसंवर्धन विभागाने गेल्या १३४ वर्षांत महाराष्ट्रातील शेतकरी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीत मोलाचे योगदान दिले आहे. विभागाच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात घोड्यांची पैदास आणि जनावरांचे आरोग्य संवर्धन ही प्रमुख उद्दिष्टे होती. कालानुरूप विभागाच्या कार्याचा विस्तार होत पशुधनाची आनुवंशिक सुधारणा, दुग्ध उत्पादन, अंडी उत्पादन, मांस व लोकर उत्पादन वाढविणे, तसेच पशुसंगोपन व पशुपैदाशी विषयक प्रशिक्षणाद्वारे रोजगार निर्मिती यावर भर देण्यात आला आहे.

पशुसंवर्धन हा केवळ जोडधंदा न राहता शेतकऱ्यांसाठी बाराही महिने उत्पन्न देणारा मुख्य व्यवसाय ठरत आहे. कुक्कुटपालन, संकरीत गायींची पैदास, स्थानिक गोवंश सुधारणा, शेळी-मेंढी विकास अशा विविध योजनांद्वारे शेतकरी, आर्थिक दुर्बल घटक व सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन दिनानिमित्त राज्यातील पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रातील निवडक गावांमध्ये कार्यमोहीम शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये पशुपालकांना उन्हाळ्यात पशुधनाची घ्यावयाची काळजी, मान्सूनपूर्व लसीकरण, पशुसंवर्धन विषयक सुधारित व्यवस्थापन पद्धती, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.



पशुसंवर्धन दिनानिमित्त मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना आणि अन्य उपक्रमांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय, जिल्हा व तालुका मुख्यालयांवर चर्चासत्रे, प्रबोधनपर कार्यक्रम, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जनजागृती उपक्रम आयोजित करून पशुसंवर्धन विभागाच्या कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात आली. पशुपालकांनी समाधान व्यक्त करत पशुसंवर्धनविषयक माहिती जाणून घेतली.





> “पशुसंवर्धन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत आधार असून, शेतकरी व पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विभाग विविध योजनांद्वारे सातत्याने कार्यरत आहे. पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व योजनांचा लाभ घेऊन ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.”
>
> **डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)**
> आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य

# शाळगाव येथे 'पशुसंवर्धन दिन' उत्साहात साजरा; विविध उपक्रमांना पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद








**कडेगाव (जि. सांगली):**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुधन व्यवसायाला बळकटी देण्यासाठी आणि पशुपालकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळगाव येथे 'पशुसंवर्धन दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि. २० मे २०२६ रोजी पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्था.) शाळगाव (ता. कडेगाव, जि. सांगली) येथे या निमित्ताने विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यमोहीम शिबिर, महिला बचत गट चर्चासत्र, शासकीय योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष पशुवैद्यकीय उपचार अशा विविध उपक्रमांद्वारे पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरादरम्यान परिसरातील अनेक पशुपालकांनी आपल्या जनावरांसह उत्स्फूर्त हजेरी लावली. जनावरांच्या शरीरातील आंतरिक परजीवींचा (जंत) प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुमारे १०० माड्यांना जंतनाशक औषधांचे वाटप व डोस देण्यात आले. ग्रामीण भागातील पशुपालकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या जसे की, दूध उत्पादनातील घट, प्रजननातील अडचणी, खाद्य व्यवस्थापन व शेळी-मेंढी पालनातील समस्या यावर उपस्थित तज्ज्ञांनी थेट संवाद साधून मार्गदर्शन केले. तसेच काही आजारी जनावरांवर प्रत्यक्ष उपचार करून, आजारांचे लवकर निदान व वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व पशुपालकांना पटवून देण्यात आले.





नागपूर: पशुसंवर्धन दिनानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, महाराज बाग नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष पशु आरोग्य पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या विशेष शिबिरामध्ये सुमारे ११० लहान व मोठ्या जनावरांवर तसेच पाळीव श्वानांवर उपचार करण्यात आले. शिबिरादरम्यान विविध आजारांची तपासणी, औषधोपचार, जंतनिर्मूलन, आरोग्य मार्गदर्शन तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली. श्वानांसाठी अँटी रेबिज लसीकरण, डिवार्मिंग तसेच इतर आवश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जनावरांमध्ये होणारे आजार, त्वचारोग, पचनसंस्थेचे विकार तसेच संसर्गजन्य रोगांबाबत पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजना'**

ग्रामीण भागातील युवक, महिला आणि पशुपालकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करता यावा यासाठी शासनाच्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजने'बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. योजनेसाठी लागणारी पात्रता, अर्जाची प्रक्रिया आणि मिळणारे लाभ समजावून सांगत, पशुधनावर आधारित उद्योग उभारून रोजगार निर्मिती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी तात्याराव कनले यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बदलत्या हवामानातील पशुपालन, रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब कसा करावा, याचे तंत्रशुद्ध ज्ञान पशुपालकांना मिळाले. "अशा शिबिरांमुळे पशुपालक आणि पशुवैद्यकीय विभाग यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होतो. भविष्यातही ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी असे मार्गदर्शनाचे व उपचारांचे उपक्रम सातत्याने राबवले जातील," असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



मौजे कापशी (ता. कागल) येथे २० मे रोजी पशुसंवर्धन दिनानिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रमात जिल्हा परिषद कोल्हापूरच्या अध्यक्षा मा. शिल्पा खोत, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जसमीन (भा.प्र.से.), उपाध्यक्ष श्री. तानाजी पाटील आणि सर्व सन्माननीय सभापती व खातेप्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गोमातेचे पूजन करण्यात आले. या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.




जागतिक पशुसंवर्धन दिनानिमित्त मौजे पिंपळगाव मिश्री (ता. नांदेड) येथील पशुरोग निदान शिबिरात शेतकऱ्यांना चारा पिकांबद्दल व कडबाकुट्टी यंत्राद्वारे चारा बचतीबाबत मार्गदर्शन करताना जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. एस. बी. खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. अरविंद गायकवाड आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी-कर्मचारी.

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना

## महाडीबीटी पोर्टलचे काम पूर्ण होताच ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला सुरुवात होणार




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ देणारी व पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे आधुनिक स्वरूप देणारी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग कटिबद्ध आहे. महाआयटीकडून 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी सुविधा निर्माण करणे सुरु असून, हे काम पूर्ण होताच इच्छुक लाभार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील, अशी माहिती आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली आहे.

राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायाला नवी दिशा देण्यासाठी व ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना राज्याच्या आर्थिक विकासात भरीव योगदान देणारी ठरणार आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी राज्यातील युवावर्गासह शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर, योजनेची अंमलबजावणी वेळेवर व पारदर्शकपणे व्हावी, यासाठी पशुसंवर्धन विभागाने सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे.

### महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज प्रक्रिया

लाभार्थ्यांना घरातूनच सहज अर्ज करता यावा, यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी महाआयटीकडे विशेष पोर्टल निर्मितीचे काम सोपविण्यात आले आहे. महाआयटीची तांत्रिक टीम हे पोर्टल लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहे. पोर्टलचे काम पूर्ण होताच, योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची सूचना पशुसंवर्धन विभागामार्फत लवकरच जारी करण्यात येईल, असे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

"मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेविषयी कोणतीही अधिकृत माहिती, शंका किंवा मार्गदर्शनासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी '१९६२'या टोल-फ्री कॉल सेंटर क्रमांकावर तसेच, नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून माहिती घ्यावी."

**डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.),
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पशुसंवर्धन विभागाचा स्तुत्य उपक्रम

## राज्यभरात शेळी-मेंढी उपचार शिबिरांचे आयोजन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात मेंढपाळ आणि पशुपालक बांधवांसाठी विशेष -शेळी व मेंढी रोगनिदान व उपचार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत पशुधनाचे आरोग्य राखण्यासाठी आणि मेंढपाळांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेळ्या-मेंढ्यांमध्ये विविध संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभागामार्फत या शिबिरांमध्ये पावसाळीपूर्व लसीकरण व जंतनाशक (Deworming) औषधोपचार मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे पशुधनाची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होणार आहे.

शिबिरादरम्यान पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी मेंढपाळ बांधवांशी थेट संवाद साधला. बदलत्या हवामानात पशुधनाची काळजी कशी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन करताना महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रबोधन करण्यात आले:

**गुणवत्तापूर्ण चारा:** पावसाळ्यात ओल्या चाऱ्याचे व्यवस्थापन आणि सुक्या चाऱ्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

**आहार नियोजन:** गाभण व लहान करडांच्या आहारातील आवश्यक घटकांचा समावेश याबाबत मेंढपाळ बांधवांचे प्रबोधन करण्यात आले.

**खनिज मिश्रण (Mineral Mixture):** पशुधनाची ताकद व दुग्धउत्पादन वाढवण्यासाठी पूरक घटकांची माहिती देण्यात आली.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी नेहमीच समाजकल्याणाचा विचार केला. त्यांच्या जयंतीनिमित्त मेंढपाळ बांधवांच्या दारात जाऊन सेवा देण्याचा हा विभागाचा प्रयत्न आहे. पावसाळ्यात होणारे आजार टाळण्यासाठी सर्व मेंढपाळांनी आपल्या शेळ्या-मेंढ्यांचे लसीकरण वेळेत करून घ्यावे."

**डॉ. शितलकुमार मुकणे**

अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा, व्यवस्थापकीय संचालक: पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ







पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित व मेंढपाळांसाठी अत्यंत लाभदायक ठरलेल्या या शिबिरांमध्ये प्रामुख्याने शेळ्या-मेंढ्यांच्या जंत निर्मूलनासाठी शेण नमुने तपासून जंतनाशक औषधे पाजली गेली. तसेच आंत्र विचार, घटसर्प व पीपीआर यांसारख्या घातक रोगांपासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी मान्सूनपूर्व लसीकरण करण्यास प्रारंभ करण्यात आला. यासोबतच, आजारी जनावरांची तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार, शस्त्रक्रिया, खच्चीकरण आणि पशुवैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. पशुपालकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे घेऊन शासनाच्या विविध पशुसंवर्धन योजनांची व करडे संगोपनाची सविस्तर माहिती दिली गेली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ आपत्कालीन प्रतिसाद केंद्राकडील 'व्हाट्सअप चॅटबॉट'ची प्रसिद्धी करून पशुपालकांना व्हिडिओ कॉलिंग सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ

स्थापना : १९७८

शेळी मेंढी पालनातुन समृध्दी




Latitude: 21.030155
Longitude: 76.142067
Elevation: 227.44±7.6 m
Accuracy: 3.813 m
Time: 31-05-2026 09:22




Satarda, Maharashtra, भारत
Google



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष पशुपालक मार्गदर्शन व आरोग्य शिबिर





पालघर: पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती पालघर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे (प्रक्षेत्र दहिवडी, सातारा) व आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०२ जून २०२६ रोजी “१०+१ शेळी गट वाटप कार्यक्रम” तसेच विशेष पशुपालक आरोग्य व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा शेती व पशुपालन क्षेत्राशी असलेला जिव्हाळा लक्षात घेऊन राज्यभर मेंढपाळ व पशुपालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत लाभार्थी पशुपालकांना शेळ्यांसाठी आवश्यक औषधांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात डॉ. राहुल संख्ये, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती पालघर यांनी शेळ्यांचे जंतनिर्मूलन, लसीकरण, संतुलित आहार व्यवस्थापन, करडे संगोपन तसेच रोग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. पंकज अवताडे, पशुवैद्यकीय चिकित्सालय, मनोर यांनी आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आंत्रविषार, घटसर्प आणि पी.पी.आर. या रोगांविरुद्ध मान्सूनपूर्व लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमासाठी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळ, पुणे डॉ. शीतलकुमार मुकणे यांनी तसेच प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, कोकण विभाग डॉ. प्रशांत कांबळे, डॉ. भुवनेश्वर बोरकर, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास डॉ. भुवनेश्वर बोरकर, तसेच डहाणू येथील आदिवासी विकास प्रकल्पाचे पदाधिकारी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मार्गदर्शन केले. यावेळी सक्षम, दिव्या, प्रगती, शारदा आणि युवा स्वयं-सहाय्यता महिला बचत गट, टाकवाल, सावरा व मनोर (ता. पालघर) यांनी निवड समितीच्या सहमतीने १०+१ शेळी गटासाठी लाभार्थ्यांची निवड केली. या योजनेअंतर्गत एकूण ६६ शेळ्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पुणे विभाग, डॉ. समीर बोरकर व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजेश वासनिक यांनी रेश्मा हाके, खंडोबाचीवाडी, ता. बारामती, जि. पुणे यांच्या राष्ट्रीय पशुधन अभियानातंर्गत (एनएलएम) स्थापित मेंढीपालन प्रकल्पाला भेट देत प्रकल्पाची पाहणी केली.




प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पुणे विभाग, डॉ. समीर बोरकर व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजेश वासनिक यांनी अमोल दत्तात्रय लोंढे, देऊळगाव रसाळ ता. बारामती, जि. पुणे यांच्या राष्ट्रीय पशुधन अभियानातंर्गत (एनएलएम) स्थापित कुक्कुटपालन प्रक्षेत्राला भेट देत पाहणी केली.

महापशुधन वार्ता

# मोफत लसीकरण व जंतनाशक शिबिराचे आयोजन



**नागपूर:** जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, महाराज बाग, नागपूर येथे ११ मे २०२६ रोजी पाळीव प्राण्यांसाठी एक दिवसीय मोफत लसीकरण व जंतनाशक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागपूर शहर तसेच परिसरातील ६० पेक्षा अधिक Pet Parents यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या पाळीव प्राण्यांची तपासणी, लसीकरण व जंतनाशक उपचार करून घेतले.

या विशेष उपक्रमाचा मुख्य उद्देश पाळीव प्राण्यांच्या आरोग्याबाबत जनजागृती करणे, नियमित लसीकरणाचे महत्त्व पटवून देणे तसेच संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळवून देणे हा होता. शिबिरादरम्यान तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून Pet Parents यांना पाळीव प्राण्यांचे संगोपन, संतुलित आहार व्यवस्थापन, स्वच्छता, नियमित आरोग्य तपासणी तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे Pet Parents साठी तयार करण्यात आलेल्या “Pet Parent's Book” या माहितीपूर्ण PDF पुस्तकाचे QR Code द्वारे करण्यात आलेले अनावरण होय. उपस्थित Pet Parents यांनी या अभिनव उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर विभाग डॉ. सतीश राजू उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शनपर भाषणात पाळीव प्राण्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नागपूर कार्यालयातील डॉ. प्रज्ञा डायगव्हाणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तसेच डॉ. प्रशांत चौधरी, पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. सुबोध नंदागवळी यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व मार्गदर्शन केले. तसेच डॉ. हर्षल रेवतकर, पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ. प्रीती शिरसाट, पशुवैद्यकीय अधिकारी आणि राहुल चोपकर, पशुधन पर्यवेक्षक यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले. या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या सर्व Pet Parents यांनी भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त करत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# 'पशुपालक ते पशुउद्योजक' प्रशिक्षणाचा समारोप



जुन्नर (जि. पुणे) येथील पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पशुपालक ते पशुउद्योजक' या सहा दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहात पार पडला. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी पशुपालकांना विविध शासकीय योजना, आरोग्य व्यवस्थापन व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या सहाव्या दिवशी जुन्नर येथील सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) **डॉ. अरविंद ढगे** यांनी पशुपालकांशी संवाद साधला. त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. विशेषतः **किसान क्रेडिट कार्ड (KCC) च्या माध्यमातून** पशुपालनासाठी कर्ज सुविधा कशी मिळवावी, याबाबत मार्गदर्शन केले. एफ.एम.डी. (लाळ्या खुरकुत) लसीकरणाचे महत्त्व व पशुधनाच्या आरोग्यासाठी त्याचे फायदे स्पष्ट केले. पशुधनाला टॅगिंग करणे का अनिवार्य आहे व त्याचे विमा तसेच इतर लाभांसाठी असलेले महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पशुपालनास कृषी दर्जा प्राप्त झाल्याने मिळणारे फायदे व शंकांचे निरसनही डॉ. ढगे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सांगता समारंभास जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक **मा. ज्ञानेश्वर खंडागळे** यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह (ट्रॉफी) देऊन गौरविण्यात आले. या प्रशिक्षणा मुळे स्थानिक पशुपालकांना आधुनिक उद्योजक बनण्यासाठी मोठी दिशा मिळाली असून, जुन्नर तालुक्यातील पशुसंवर्धनाला यामुळे नवी चालना मिळेल, हा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आयुर्वेदिक उपचार पद्धतीवर भर: **यावेळी ई. व्ही. एम. (EVM-Ethno-Veterinary Medicine) अर्थात पशुधनावरील आयुर्वेदिक औषधोपचार पद्धतीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कमी खर्चात व घरगुती उपलब्ध साहित्यातून जनावरांचे आजार कसे बरे करता येतात, यावर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.**

# कृषि विज्ञान केंद्र कांचनपूर येथे 'गाय व म्हैस पालन प्रशिक्षण' संपन्न




**मिरज (सांगली):** वसंत-प्रकाश विकास प्रतिष्ठान संचलित, कृषि विज्ञान केंद्र (KVK) कांचनपूर, सांगली येथे पशुपालकांसाठी आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय मोफत 'गाय व म्हैस पालन प्रशिक्षण' नुकतेच उत्साहात संपन्न झाले. दिनांक २१ मे २०२६ ते २३ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या विशेष प्रशिक्षण शिबिराला जिल्ह्यातील पशुपालकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान आधुनिक पशुपालनासोबतच शासनाच्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजने'बाबत पशुपालकांना सविस्तर माहिती व मार्गदर्शन करण्यात आले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणात गाय व म्हैस पालनातील आधुनिक तंत्रज्ञान, जनावरांचे आरोग्य, दूध उत्पादन वाढीसाठी सकस आहार व त्यांचे योग्य व्यवस्थापन याविषयी तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पशुपालन हा व्यवसाय केवळ पारंपरिक पद्धतीने न करता तो व्यावसायिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून कसा करावा, याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण पशुपालकांना देण्यात आले. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व सहभागी पशुपालकांना केंद्राच्या वतीने प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजने'ची माहिती

प्रशिक्षणाचे एक मुख्य आकर्षण म्हणजे ग्रामीण भागात पशुधनावर आधारित नवउद्योग सुरू करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असलेल्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजने'चे मार्गदर्शन होय. ग्रामीण भागातील युवक, महिला आणि शेतकरी या योजनेचा लाभ घेऊन स्वतःचा दुग्धव्यवसाय किंवा पूरक उद्योग कसा उभा करू शकतात, योजनेसाठीची पात्रता काय आहे, अर्जाची प्रक्रिया व शासनाकडून मिळणारे आर्थिक सहाय्य याबद्दल पशुपालकांना सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केव्हीके (KVK) कांचनपूरचे पशुसंवर्धन विभागाचे विषय विशेषज्ञ डॉ. विपीन वाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कृषि विज्ञान केंद्र कांचनपूर येथे झालेल्या या प्रशिक्षणामुळे सांगली जिल्ह्यातील पशुपालकांना आधुनिक व्यवस्थापनाची दिशा मिळाली असून, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेच्या माहितीमुळे ग्रामीण भागात नवीन पशुधन उद्योजक घडण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.



देशाची एकता, अखंडता व सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी दहशतवादाचा बिमोड करणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर, दि. २१ मे २०२६ रोजी पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त -देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा शक्तीनिशी मुकाबला करण्याची शपथ सहआयुक्त पशुसंवर्धन ( मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे यांनी दिली. यावेळी आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




पशुसंवर्धन विभागाच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा परिषद सांगलीच्या अध्यक्षा श्रीमती संगिता पाटील यांनी जिल्हा पशुसर्वचिकित्सालय मिरज व जिल्हा उपायुक्त प.व दु. कार्यालयाला भेट देऊन मार्गदर्शन केले.

# 'मेगा स्वीट ज्वार' चारा पिकाची १३ फुटांपर्यंत विक्रमी वाढ



पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे (पुणे) येथे राबविण्यात येत असलेल्या जिवामृत निर्मिती प्रकल्पाचे अत्यंत सकारात्मक परिणाम समोर आले आहेत. या प्रकल्पातील सेंद्रिय 'जिवामृता'चा वापर प्रक्षेत्रावरील शेतीमध्ये करण्यात येत असून, यामुळे चारा पिकांच्या एकरी उत्पादनात मोठी व विक्रमी वाढ झाली आहे. परिणामी, येथील पशुधनासाठी आता मुबलक व दर्जेदार चारा उपलब्ध होत आहे. या जिवामृताच्या नियमित वापरामुळे जमिनीची सुपीकता वाढली असून, पिकांची वाढ अत्यंत जोमदार होत आहे. याचाच एक विशेष व थक्क करणारा परिणाम म्हणजे प्रक्षेत्रावर लागवड करण्यात आलेले 'मेगा स्वीट ज्वार' हे चारा पीक तब्बल १३ फुटांपर्यंत वाढले आहे. जिवामृताच्या वापरामुळे पारंपरिक शेतीच्या तुलनेत कमी खर्चात व रासायनिक खतांशिवाय चाऱ्याचे उत्पादन दुपटीने वाढवणे शक्य झाले आहे. हा उपक्रम इतर शेतकऱ्यांसाठी व पशुपालकांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांनी व्यक्त केला आहे.

महापशुधन वार्ता

# डॉ. के. संपतकुमार यांची पोहरा येथील शासकीय पशुपैदास प्रक्षेत्राला भेट



**अमरावती:** दिनांक २१ मे २०२६ रोजी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाचे मास्टर ट्रेनर डॉ. के. संपतकुमार (कोयंबतुर, तामिळनाडू) यांनी शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, पोहरा (जि. अमरावती) येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रक्षेत्रावरील नैसर्गिक शेती आणि जीवामृत प्रकल्प स्थापनेच्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्षेत्राची सविस्तर पाहणी केली.

डॉ. संपतकुमार यांनी प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व पटवून दिले, तसेच जीवामृत निर्मिती प्रक्रिया आणि त्याचे शेतीसाठी होणारे फायदे याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांना प्रक्षेत्रावरील वैशिष्ट्यपूर्ण 'गवळाऊ' गोवंशाच्या व्यवस्थापनाची आणि त्याच्या पौराणिक इतिहासाची माहिती देण्यात आली. सोबतच, गवळाऊ गोवंशाच्या दुहेरी उपयुक्ततेबाबतही (दूध उत्पादन आणि शेतीकामासाठीची क्षमता) सविस्तर चर्चा झाली.

या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. रामेश्वर अढाऊ, पशुधन विकास अधिकारी डॉ. रमेश राऊत व प्रतिक वानखडे, सहायक पशुधन विकास अधिकारी श्री. सतीश ढोके, सहायक वैरण विकास अधिकारी श्री. चंद्रशेखर गिरी यांच्यासह प्रक्षेत्रावरील इतर कर्मचारी उपस्थित होते. या भेटीमुळे प्रक्षेत्रावर नैसर्गिक शेती व जीवामृत प्रकल्पाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे.

महापशुधन वार्ता

# यशकथा: होळकर महामेष योजनेतून राजू थोटे यांनी साधली प्रगती; मेंढीपालनातून मिळवले लाखो रुपयांचे उत्पन्न!

नागपूर: शासनाच्या कल्याणकारी योजना जर योग्य नियोजन व कष्टाची जोड देऊन राबवल्या, तर ग्रामीण भागातील कुटुंबांचे जीवनमान कसे उंचावू शकते, याचे उत्तम उदाहरण नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात समोर आले आहे. मौजा मोहगाव येथील प्रयोगशील शेतकरी श्री. राजू संभाजी थोटे यांनी राज्य पशुसंवर्धन विभागाच्या 'होळकर महामेष योजना २०२४-२५' अंतर्गत मेंढीपालन व्यवसाय सुरू करून आर्थिक सुबत्तेकडे यशस्वी पाऊल टाकले आहे.




राजू थोटे यांची या योजनेतील घटक क्र. १ (कायमस्वरूपी एकाच ठिकाणी राहून मेंढीपालन करणे) अंतर्गत ' पायाभूत सुविधेसह २०+१ मेंढी गट वाटप' योजनेसाठी लाभार्थी म्हणून निवड झाली.

- **प्रकल्पाची एकूण किंमत:** ₹ ३,३३,०००/-
- **शासकीय अनुदान (७५%):** ₹ २,४९,७५०/-
- **लाभार्थी हिस्सा (२५%):** ₹ ८३,२५०/-



फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत श्री. थोटे यांनी योजनेच्या अटी व शर्तींनुसार मेंढ्यांसाठी आवश्यक शेड व पायाभूत सुविधांचे बांधकाम पूर्ण केले व उत्तम दर्जाच्या मेंढ्यांची खरेदी करून प्रकल्पाची यशस्वी सुरुवात केली.




### अवघ्या एका वर्षात उत्पन्नाचा आलेख उंचावला

राजू थोटे यांच्या चिकाटीमुळे व उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे अवघ्या एका वर्षात त्यांच्या मेंढी गटामध्ये १० नर व ७ मादी अशा एकूण १७ पिल्लांची वाढ झाली. यातून त्यांनी खालीलप्रमाणे आर्थिक नफा मिळवला:

- १० पिल्लांच्या विक्रीतून ₹१,०४,०००/- चे उत्पन्न मिळाले.
- लेंडीखत विक्रीतून ₹४,०००/- चे अतिरिक्त उत्पन्न मिळाले.
- शिल्लक सेंद्रिय खताचा वापर स्वतःच्या शेतीत केल्यामुळे पिकांचे उत्पादन वाढले व रासायनिक खतांचा खर्चही वाचला.

थेट विक्रीतून थोटे यांना सुमारे ₹१,२०,०००/- चे उत्पन्न मिळाले असून, सध्या त्यांच्याकडे मूळ गटासह एकूण मेंढ्यांची संख्या वाढून २६ झाली आहे. म्हणजेच त्यांची मूळ संपत्तीही वाढली आहे.

### अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन

१. श्री. अविरत सवाईमुल (पविअ- विस्तार): यांनी योजनेचे अचूक नियोजन, तांत्रिक मार्गदर्शन व सतत पाठपुरावा करून थोटे यांना प्रकल्प यशस्वी उभारणीसाठी प्रेरित केले.

२. श्री. राहुल बंधाते (पशुधन पर्यवेक्षक, साळवा): यांनी मोहगाव येथे वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी देऊन मेंढ्यांचे लसीकरण, आरोग्य तपासणी, औषधोपचार व पशुसंवर्धनाचे तांत्रिक व्यवस्थापन चोख सांभाळले.

पशुसंवर्धन विभागाच्या योजना तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचल्यास शेतकऱ्यांचे जीवनमान नक्कीच उंचावू शकते व ग्रामीण विकासाला गती मिळू शकते, हेच या यशस्वी प्रकल्पातून दिसून येते. शासकीय योजनेचा तांत्रिक मार्गदर्शनाखाली योग्य वापर केला, तर मेंढीपालन हा कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी एक खात्रीशीर व फायदेशीर जोडधंदा ठरू शकतो, अशी प्रतिक्रिया यानिमित्ताने श्री. राजू संभाजी थोटे हे व्यक्त करतात.

# लहान वय, मोठी जिद्द – कोंबडी पालनातून उभं राहतंय एक स्वप्न

गावाच्या कडेला असलेल्या साध्या घरातून सुरू झालेली ही एका छोट्या मुलाची मोठी गोष्ट आहे. शिवराज समीर कांबळे, इयत्ता सातवी, वय १३ वर्षे, हा शाळगाव, ता. कडेगाव, जि. सांगली येथील रहिवासी मुलगा लहान वयातच कष्ट, जबाबदारी व स्वावलंबन यांचा आदर्श घालून देत आहे. विशेष म्हणजे, त्याने पहिलीपासूनच कोंबडी पालनाचा व्यवसाय सुरू केला आहे. ज्या वयात मुलं खेळण्यात रमलेली असतात, त्या वयात त्याने आयुष्याची खरी शाळा शिकायला सुरुवात केली.

"लहानपणीचे संस्कार आयुष्य घडवतात" ही म्हण त्याच्यावर अगदी तंतोतंत लागू पडते. घरची परिस्थिती साधी व कधी कधी बिकट असली तरी शिवराजची जिद्द मात्र प्रचंड आहे. "जिथे इच्छा तिथे मार्ग" या म्हणीप्रमाणे त्याने अडचणींना कधीच घाबरून न जाता, त्यातूनच स्वतःचा मार्ग तयार केला. सुरुवातीला त्याने गावातील वेगवेगळ्या व्यक्तींमधून कोंबड्या विकत घेतल्या. थोडेथोडके पैसे साठवून, कधी उधारीने तर कधी स्वतःच्या कमाईतून त्याने हा व्यवसाय हळूहळू वाढवला. "थेंबे थेंबे तळे साचे" या विचाराने त्याने आपली वाटचाल कायम ठेवावी. याचबरोबर तो दुकानांमधून देशी अंडी विकत आणतो आणि ती अंडी कोंबडीखाली उबवणीसाठी ठेवतो. काही दिवसांनी त्या अंड्यांमधून गोंडस पिल्लं बाहेर येतात. तो क्षण त्याच्यासाठी जणू सणासारखा असतो.



"मेहनतीचे फळ गोड असते" याचा तो दररोज अनुभव घेत आहे. पिल्लं बाहेर आल्यानंतर त्यांची काळजी घेणं ही मोठी जबाबदारी असते, पण शिवराज ती अतिशय प्रेमाने पार पाडतो. तो त्यांना वेळेवर खाद्य देतो, स्वच्छ पाणी देतो आणि उबदार वातावरण देतो.

एखादी कोंबडी किंवा पिल्लू आजारी पडलं की त्याच्या डोळ्यात पाणी येतं, कारण त्याच्यासाठी हा व्यवसाय नाही, तर त्याचं एक छोटंसं कुटुंब आहे. "जिथे माया, तिथे जपणूक" हे त्याच्या प्रत्येक कृतीतून स्पष्ट दिसून येतं. सध्या शिवराज समीर कांबळेकडे १ नर कोंबडा, ४ मादी कोंबड्या आणि सुमारे चार महिन्यांची १७ पिल्लं आहेत. त्याच्या कोंबड्यांमधून दर महिन्याला सुमारे १२० अंडी उत्पादन मिळते. प्रत्येक अंड्याची विक्री तो १० रुपये नगाप्रमाणे करतो. या उत्पन्नाच्या माध्यमातून तो स्वतःच्या गरजा भागवतो व घर खर्चालाही हातभार लावतो. एवढ्या लहान वयात उदरनिर्वाहाची महत्वपूर्ण जबाबदारी सांभाळणं ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे.



या सगळ्या प्रवासात अडचणीही कमी नाहीत–कधी कोंबड्या आजारी पडतात, कधी हवामानाचा विपरित परिणाम होतो, तर कधी बाजारात योग्य भाव मिळत नाही. पण "अपयश हे यशाची पहिली पायरी असते" या विश्वासाने तो प्रत्येक वेळी पुन्हा उभा राहतो. प्रत्येक अडचणीतून शिकत तो स्वतःला अधिक मजबूत बनवत आहे. या प्रवासात त्याला डॉ. शिवानी तात्याराव कनले, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना (स्था.) शाळगाव, ता. कडेगाव, जि. सांगली यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. वेळोवेळी त्याला योग्य सल्ला, उपचार आणि आवश्यक मदत मिळत असल्यामुळे त्याचा व्यवसाय अधिक सक्षमपणे पुढे जात आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास छोटा व्यवसायही मोठ्या यशात रूपांतरित होऊ शकतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

शिवराजची ही कथा आपल्याला एक मोठा संदेश देते–वय लहान असलं तरी स्वप्नं मोठी असू शकतात, आणि त्यासाठी मेहनत करण्याची तयारी असेल तर यश नक्की मिळतं. "कष्टाला पर्याय नाही" हे त्याने आपल्या कृतीतून सिद्ध केलं आहे.

आज तो छोट्या प्रमाणात कोंबडी पालन करतो आहे, पण उद्या तो नक्कीच एक यशस्वी उद्योजक होऊ शकतो. योग्य मार्गदर्शन, थोडा आधार आणि समाजाचा पाठिंबा मिळाला, तर त्याची ही छोटीशी सुरुवात मोठ्या यशात रूपांतरित होईल. ही केवळ एका मुलाची गोष्ट नाही, तर ती आहे जिद्दीची, कष्टाची, मायेची आणि स्वप्नांवर विश्वास ठेवण्याची गोष्ट–जी प्रत्येकाला प्रेरणा देऊन जाते. "जिद्द असेल तर अशक्य काहीच नाही" हे शिवराजने आपल्या आयुष्यातून दाखवून दिलं आहे.

महापशुधन वार्ता

# वणीत उष्माघाताने व्याकुळ झालेल्या अजगरावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे यशस्वी उपचार



**वणी (यवतमाळ):** संपूर्ण विदर्भात तापमानाचा पारा वाढल्यामुळे केवळ नागरिकच नाही, तर मुके प्राणी व वन्यजीवही उष्माघाताचे बळी ठरत आहेत. अशीच एक घटना वणी येथे समोर आली असून, तीव्र उष्णतेमुळे आजारी पडलेल्या एका अजगराला पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे जीवदान मिळाले आहे.

दिनांक २७ मे २०२६ रोजी वणी येथील तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयात उष्माघाताने ग्रस्त असलेल्या एका अजगराला उपचारासाठी आणण्यात आले होते. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे या अजगराची प्रकृती खालावली होती. चिकित्सालयात आणले तेव्हा त्याच्यामध्ये खालील लक्षणे प्रकर्षाने जाणवत होती:

- शरीराचे तापमान कमालीचे वाढले होते.
- अशक्तपणामुळे अजगराच्या हालचाली अत्यंत मंदावल्या होत्या.
- श्वसनास त्रास होत असल्याने तोंड उघडे ठेवून श्वास घेत होता.

अजगराची गंभीर अवस्था पाहता, चिकित्सालयाच्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेरणा कनले आणि पशुधन पर्यवेक्षक श्री. अखिल गुंजेवार यांनी जराही वेळ न गमावता तत्काळ प्राथमिक उपचार सुरू केले.

उष्माघाताचा तीव्र फटका बसल्यामुळे अजगराच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले होते. त्यासाठी डॉक्टरांनी त्याला फ्लुइड थेरपी दिली व आवश्यक औषधोपचार केले. डॉक्टरांच्या या अचूक व वेळेवर मिळालेल्या उपचारांमुळे अजगराच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होऊन त्याची प्रकृती स्थिर झाल्यानंतर वनविभागाकडे सुपूर्द करण्यात आले.




# उष्माघाताने व्याकुळ झालेल्या दोन रोहींवर यशस्वी उपचार

**नांदेड:** सध्या पडत असलेल्या कडक उन्हाचा व वाढत्या तापमानाचा फटका मानवाप्रमाणेच वन्यजीवांनाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. उमरी तालुक्यातील वसंत नगर तांडा परिसरातील सोलर पॅनल कंपनी एरियामध्ये तीव्र उष्माघातामुळे (Heat Stroke) दोन रोही (नीलगाय) अचानक आजारी पडल्याची घटना समोर आली. मात्र, पशुसंवर्धन विभागाने दाखवलेल्या तत्परतेमुळे या दोन्ही वन्यजीवांना वेळेवर उपचार मिळून जीवदान मिळाले आहे.

वसंत नगर तांडा येथील सोलर पॅनल कंपनी परिसरात दोन नीलगायी उन्हाच्या तीव्रतेने व्याकुळ होऊन आजारी अवस्थेत पडल्याची माहिती मिळताच, उमरी पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने जराही वेळ न गमावता थेट घटनास्थळ गाठले.

तीव्र उष्णतेमुळे या दोन्ही वन्यजीवांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले होते आणि त्यांना उष्माघाताचा तीव्र त्रास होत होता. पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांनी आणि पथकाने घटनास्थळीच खालीलप्रमाणे तातडीचे उपचार केले:

- दोन्ही रोहींना उष्माघातातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक ती जीवरक्षक औषधे देण्यात आली.
- शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी आणि डिहायड्रेशन कमी करण्यासाठी आवश्यक प्रथमोपचार करण्यात आले.

पशुसंवर्धन विभागाच्या या अत्यंत वेगवान व अचूक उपचारांमुळे दोन्ही रोहींच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून, त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. अतिशय दुर्गम भागात जाऊन वन्यजीवांवर वेळेत उपचार केल्याबद्दल उमरी पशुसंवर्धन विभागाच्या पथकाचे परिसरात कौतुक होत आहे. उन्हाळ्याच्या या दिवसांमध्ये पाण्याचे स्रोत आटल्यामुळे वन्यजीव पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांकडे किंवा उघड्या माळावर येतात. नागरिकांना किंवा शेतकऱ्यांना कुठेही असे वन्यजीव उष्माघाताने किंवा पाण्यासाठी व्याकुळ झालेले आढळल्यास, त्यांनी तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापशुधन वार्ता

# करडावर पोटाच्या हर्नियाची क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वी

## मौदा येथील पशुवैद्यकीय चमूची कमाल



**पशुसंवर्धन विभाग, नागपूर**

पशुवैद्यकीय क्षेत्रातील अचूक निदान व कौशल्याचे दर्शन घडवत, नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील अरोली येथील पशुवैद्यकीय चिकित्सालतील डॉक्टरांनी एका तीन महिन्यांच्या बकरीच्या नर करडूवर अत्यंत क्लिष्ट अशी हर्नियाची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली आहे. मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या या मुक्या प्राण्याला जीवदान मिळाल्याने पशुपालकामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

रामटेक तालुक्यातील आसोली येथील पशुपालक श्री. राहुल दुरबुधे यांच्याकडे एक जातीवंत तीन महिन्यांचे नर करडू आहे. गेल्या ४-५ दिवसांपासून या करडूच्या पोटाच्या उजव्या बाजूला मोठी सूज आली होती. सुरुवातीला खासगी स्तरावर उपचार करण्यात आले, मात्र सूज कमी न होता वाढतच गेली. परिणामी, करडूने खाणे-पिणे पूर्णपणे सोडून दिले व त्याची प्रकृती चिंताजनक झाली. अखेर दुरबुधे यांनी त्याला पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्था.), अरोली येथे आणले.



चिकित्सालयातील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अंकित मते यांनी करडूची तपासणी केली असता, त्याला 'हर्निया' (Hernia) झाल्याचे निदान झाले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. शस्त्रक्रिया सुरू असताना डॉक्टरांना या केसचे गांभीर्य अधिक स्पष्ट झाले. हर्नियाच्या छिद्रामध्ये (Hernial Ring) मोठी आतडी अडकून ती फाटली होती. फाटलेल्या आतडीतील चारा बाहेर आल्यामुळे तो सर्व आतड्यांना चिटकला होता आणि त्याभोवती 'अडेजण' (Adhesions) तयार झाले होते.

ही स्थिती अत्यंत क्लिष्ट व जीवघेणी होती. मात्र, अशाही अवस्थेत डॉ. अंकित मते यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय कौशल्यपूर्वक ही शस्त्रक्रिया यशस्वी केली.

या यशस्वी शस्त्रक्रियेसाठी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नितीन फुके, सहाय्यक आयुक्त डॉ. मोहन पुंडलिक, आणि पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. श्रद्धा वासनिक यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी कर्मचारी श्री. अमित सावळीकर आणि श्री. जयप्रकाश मारवाडी यांनी मोलाचे सहकार्य केले. वेळेत मिळालेले उपचार आणि डॉक्टरांच्या कौशल्यामुळे एका मौल्यवान करडूचे प्राण वाचले असून, या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महासागर

## नागपूर जिल्हात पशुसंवर्धन दिन मोठ्या उत्साहात साजरा



देशोन्नती

## पशुसंवर्धन दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

लोकमत

## शास्त्रीय पद्धतींच्या वापरामुळे पशुपालनातून उत्पादन वाढेल

## देवणी गोवंशासाठी हवे आधुनिक पैदास तंत्रज्ञान

तज्ज्ञांचा सूर, असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा



## पशुसंवर्धन दिवस पर नागपुर में निःशुल्क पशु स्वास्थ्य शिविर को मिला उत्साहपूर्ण प्रतिसाद



## पशुओं की हुई जांच और टीकाकरण

### पशुपालन दिवस पर शिविर का आयोजन

■नागपुर, शहर प्रतिनिधि. 20 मई 1892 को मुंबई प्रांत में पशुपालन विभाग की स्थापना हुई थी, इसलिए राज्य में हर वर्ष 20 मई को पशुपालन दिवस मनाया जाता है.



### 5,473 पशुओं की जांच

शिविर में कुल 5,473 पशुओं की जांच ... टीकाकरण किया गया. इस शिविर में शामिल 2,205 पशु पालकों को पशुपालन पर मार्गदर्शन दिया गया.

- नितिन कुके, जिला उपायुक्त, पशुपालन

महाराजबाग में किया गया शिविर का आयोजन

## 110 पशुओं का निःशुल्क उपचार

■नागपुर, शहर प्रतिनिधि. पशु संवर्धन दिवस पर जिला पशु वैद्यकीय सर्वचिकित्सालय, महाराजबाग में आयोजित विशेष निःशुल्क पशु स्वास्थ्य शिविर को ...





## पशुसंवर्धन दिनानिमित्त कोचरगाव येथे रेबीज लसीकरण



## जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र आवश्यक

लोकमत

## पशुधनासाठी धडपड; शंभर टक्के अनुदानावर चारा बियाणे

## पुण्य नगरी

# राष्ट्रीय दर्जासाठी माडग्याळ मेंढी सज्ज

केंद्रीय शास्त्रज्ञ देणार भेटी; मेंढ्यांचे जैविक नमुने करणार संकलित



## एकमत

# बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करा

पशुसंवर्धन आयुक्त यांचे शेतकऱ्यांना निर्देश

## सार्वमत

दैवत सामाजिक प्रतिष्ठान व नवनाथ डेअरी आयोजित

# टाकळीमिया येथे प्रगतीशील पशुपालक कार्यशाळा उत्साहात



# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करावी : पशुसंवर्धन आयु

नाशिक । जिमाका वृत्तसेवा

## लोकमत

# पशुधनावर 'एल निनो'चे संकट; सरकारकडून चारा बियाणे मोफत

लोकमत इन्फो स्टोरी

नागपूर : हवामान विभागाने एल निनोच्या प्रभावामुळे कमी पर्जन्यमान होण्याची शक्यता वर्तविली आहे. परिणामी, भविष्यात पशुखाद्य व हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील पशुपालकांनी आतापासूनच चारा उत्पादन वाढविण्याचे नियोजन करावे, असे आवाहन नागपूर जिल्हा पशुसंवर्धन विभागाने केले आहे. त्यासाठी शासनाच्या वतीने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वैरण विकास योजना, चारा उत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत पात्र पशुपालकांना स्वतःच्या शेतात हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे वाटप करण्यात येणार आहे.

### 'एल निनो'मुळे यंदा कमी पावसाची शक्यता

यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. याचा परिणाम शेती, पिण्याच्या पाण्याचा साठा आणि वीज निर्मितीवर होऊ शकतो. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याचीही भीती व्यक्त होत आहे.

### भविष्यात पशुखाद्य व चाऱ्याची टंचाई उद्‌भवणार

पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास भविष्यात पशुखाद्य व हिरव्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे दुग्ध व्यवसाय आणि पशुपालन क्षेत्राला मोठा फटका बसू शकतो. शेतकऱ्यांना जनावरांच्या देखभालीसाठी अधिक खर्च करावा लागणार असून उत्पादनावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची चिन्हे आहेत.

### योजनेचे स्वरूप

योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी आणि नोंदणीकृत शेतकरी समूह गट अशा दोघांनाही घेता येतो. वैयक्तिक शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन आणि सिंचन सुविधा असावी. किमान ३ ते ४ पशुधन असणे आवश्यक आहे. तसेच १ हेक्टर क्षेत्रावर चारा उत्पादन घेण्याची तयारी असावी. त्यासाठी ४ हजार रुपयांपर्यंत शंभर टक्के अनुदान मिळेल. शेतकरी समूह गटासाठी नोंदणीकृत समूह गट असणे आवश्यक असून ५ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत २० हजार रुपयांपर्यंत अनुदान अनुज्ञेय राहील.

### १०० टक्के अनुदानावर बियाणे

योजनेंतर्गत पात्र पशुपालकांना स्वतःच्या शेतात हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदानावर चारा

### योजनेची प्रमुख उद्दिष्टे ?

भविष्यातील चारा टंचाई टाळणे, पशुधनासाठी वर्षभर पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध करणे, दूध उत्पादन वाढीस चालना देणे, पशुपालकांचे आर्थिक नुकसान कमी करणे, नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

### कोणती कागदपत्रे हवी ?

७/१२ उतारा, आधार कार्ड, पशुधनाचा पुरावा, समूह गट नोंदणी प्रमाणपत्र.



### नोंदणी प्रक्रिया

करिता तालुक्यातील पंचायत समितीतील पशुसंवर्धन विभागात तसेच जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांमध्ये अर्ज गोळा करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली. पशुपालकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांच्या जनावरांकरिता हिरव्या चाऱ्याचे नियोजन करण्यासाठी वैरण बियाण्याचा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

> आता उत्पादित केलेला आणि योग्य पद्धतीने साठवून ठेवलेला चारा भविष्यातील दुष्काळ व टंचाई काळात पशुधनासाठी जीवनदायी ठरणार आहे. जिल्ह्यातील पशुपालक, प्रगतिशील शेतकरी, ग्रामीण युवकांनी योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.
>
> **डॉ. नितीन फुके**, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यव

# महापशुधन वार्ता

## पुढारी

# पशुसंवर्धन उपायुक्तांच्या तत्परतेमुळे वाचली गाय

उंब्रज : पुढारी वृत्तसेवा

पाल (ता. कराड) येथील पशुपालक शेतकऱ्याच्या गायीवर जिल्हा पशुसंवर्धन विभागाने वेळेत उपचार करून तिचे प्राण वाचविण्यात यश मिळविले आहे.

पाल येथील पशुपालक शेतकरी अनिकेत बाळासो खंडाईत यांच्या एका गाईने अचानक वैरण खाणे, पाणी पिणे, रवंथ करणे बंद केल्याने त्यांनी डॉ. सूर्यकांत नलावडे यांना बोलावून गाईची तपासणी करण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी गाईची तपासणी करून काही रक्ताची चाचणी केल्या असता, गाईचे हिमोग्लोबिन फक्त दोन पॉईंटपर्यंत घसरल्याने ती कधीही कोमात जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे गाईच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता.

डॉ. दिनकर बोर्डे व डॉ. राहुल दडस यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन उपचार सुरू केले. यावेळी पशुवैद्यकीय पथकाने उपचारादरम्यान एका गाभण पहिलारू कालवडीचे सुमारे दीड लिटर रक्त काढून ते आजारी गाईच्या शिरेद्वारे (नसांमार्फत) देण्याचा निर्णय घेतला. या रक्त संक्रमणासोबतच इतर आवश्यक उपचारही करण्यात आले. या योग्य आणि वेळीच केलेल्या उपचारांमुळे गाईची प्रकृती स्थिर झाली आणि तिचे प्राण वाचले.

या उपचारात पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे, पशुधन विकास अधिकारी डॉ. राहुल दडस, स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्यकांत नलावडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जिल्हा पशुसंवर्धन विभाग व

## पुण्य नगरी

# पशू आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त आयोजन



मलकापूर : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी देवधाबा व शिवणखुर्द परिसरात आयोजित विशेष पशू आरोग्य शिबिरास पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पशुधन पर्यवेक्षक डॉ. रघुनाथ फोपसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरात शेळ्या-मेंढ्यांचे लसीकरण, जंतनिर्मूलन व पशुपालकांना विविध योजनांचे मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत पशुवैद्यकीय चिकित्सालय, देवधाबा यांच्या वतीने हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील पशुधनाचे आरोग्य सुदृढ राखणे आणि पशुपालकांना तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिबिरात शेळ्या-मेंढ्यांची आरोग्य तपासणी करून जंतनाशक औषधोपचार करण्यात आले. तसेच आंत्रविषार, घटसर्प आणि पीपीआर यासारख्या संसर्गजन्य रोगांपासून संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण लसीकरण मोहीमही राबविण्यात आली. आजारी पशुधनावर आवश्यक उपचार करण्यात आले असून पशुपालकांना पशुसंवर्धन विषयक विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शासनाच्या पशुसंवर्धन योजनांची माहिती देण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. रघुनाथ फोपसे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या पुढाकारामुळे परिसरातील अनेक मेंढपाळ व पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवांचा थेट लाभ मिळाला. पशुधनाचे आरोग्य जपण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून भविष्यातही अशाच जनहिताच्या योजना राबविण्यात येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## माझं नंदुरबार

दक्षता • गाय-म्हैस, शेळ्या-मेंढ्यांसाठी मोहीम; आजारांपासून संरक्षण, पशुसंवर्धनचा पुढाकार

# शहादा तालुक्यात गुरांना पावसाळ्यातील आजार प्रतिबंधक लसीकरणाला सुरुवात



वेळेत लसीकरण गरजेचे



## लोकमत

# तीन लाखांपर्यंत कर्ज, शून्य व्याज; 'किसान क्रेडिट कार्ड' काढले का?

### काय आहे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजना?

### कशासाठी किती कर्ज?

### सवलत, शून्य व्याजदरावर ३ लाखांपर्यंत कर्ज



### असा आहे व्याज सवलतीचा आलेखा

### कर्ज मर्यादा १.६० लाखांचे कर्ज



### योजनेसाठी पात्रता आणि अटी

### कुठे आणि कसा करावा अर्ज?

## पुढारी

# 'लाळ-खुरकत'साठी १.१९ कोटी लस उपलब्ध

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यात लाळ्याखुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लसीकरण फेरी-९साठी पशुसंवर्धन विभागाने पूर्वतयारीला वेग दिला आहे. मे महिनाअखेरपर्यंत राज्याला सुमारे १ कोटी १९ लाखांइतकी लाळ्याखुरकत रोग नियंत्रणाकरिता लसमात्रा उपलब्ध होणार असून, लसींच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी नियोजन सुरू केल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली.

लसींचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी नव्याने २० 'वॉक-इन कोल्ड-रूम' उभारल्या असून, प्रत्येक शीतगृहात तीन लाख लस साठविण्याची क्षमता आहे. याशिवाय सध्याच्या शीतगृहांचाही पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येणार आहे.

आतापर्यंत लाळ्या[illegible] लसीकरणाच्या ८ फेऱ्या पूर्ण [illegible] असून, प्रभावी लसीकरण[illegible] राज्यात अलीकडील क[illegible] रोगाचा उद्रेक आढळलेला [illegible] सलग दोन वर्षे रोगप्रादुर्भा[illegible] झाल्यास महाराष्ट्राला 'लाळ्या[illegible] रोगमुक्त' दर्जा मिळण्याची श[illegible] आहे. त्यामुळे दुग्ध, मांस [illegible] अंडी यांसारख्या प[illegible] उत्पादनांच्या निर्यातीला च[illegible] मिळू शकते. जिल्हा[illegible] लससाठवण क्षमता [illegible] माहिती तातडीने सादर कर[illegible] आदेशही दिले आहेत. [illegible] ऑगस्ट २०२६ पासून [illegible] लसीकरण मोहीम सुरू करण्या[illegible] विभागाने तयारी सुरू के[illegible] त्यांनी कळविले आहे.

My Pune Gramin Edition
May 28, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com






**प्रा. डॉ. अनिल भिकाने**
माजी विस्तार शिक्षण संचालक,
माफसू, नागपूरमो. ९४२०२१४४५३

जागतिक पशुवैद्यक दिन दरवर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनीवारी साजरा केला जातो. यावर्षी 25 एप्रील रोजी जागतीक पशुवैद्यक दिन साजरा केला जात आहे. “पशुवैद्यक : अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक” ही या वर्षीच्या जागतिक पशुवैद्यक दिनाची अधिकृत थीम/संकल्पना असून ती जागतिक पशुवैद्यक संघटनेने निवडलेली आहे. या वर्षी साजऱ्या होणाऱ्या या दिनानिमित्त पशुवैद्यकांची बहुआयामी भूमिका अधोरेखित होते. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि वेगाने बदलणाऱ्या जीवनशैलीच्या युगात “अन्नसुरक्षा” आणि “सार्वजनिक आरोग्य” हे दोन अत्यंत महत्त्वाचे विषय ठरले आहेत. आपण जे अन्न खातो ते सुरक्षित, पोषक आणि रोगमुक्त आहे का, हा प्रश्न प्रत्येक नागरिकासाठी महत्त्वाचा आहे. आजच्या काळात पशुवैद्यक केवळ प्राण्यांचे उपचार करणारे डॉक्टर नसून ते अन्नसाखळीचे रक्षक, सार्वजनिक आरोग्याचे संरक्षक, पर्यावरणपूरक अन्नप्रणालीचे समर्थक आणि जागतिक आरोग्य सुरक्षेचे प्रमुख घटक बनले आहेत. 'एक स्वास्थ्य' (One Health) संकल्पनेद्वारे मानवी आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरण यांचा समतोल राखत, भविष्यातील महामाऱ्या रोखण्यात व दर्जेदार तसेच आरोग्यदायी अन्नाचा पुरवठा सुनिश्चित करण्यात या तज्ज्ञांचे योगदान समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी अत्यंत मोलाचे ठरत आहे. पशुवैद्यकांच्या याच समर्पित योगदानाचा धांडोळा घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न




## 1. अन्नसाखळीचे रक्षक :

दूध, मांस आणि अंडी हे प्राणिजन्य अन्नपदार्थ मानवी आहारातील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. या अन्नपदार्थांमध्ये अन्नसुरक्षा आणि अन्नसुरक्षितता सुनिश्चित करणे म्हणजे स्वच्छ, रोगमुक्त, पौष्टिक अन्न सर्वांना उपलब्ध राहणे. या संपूर्ण प्रक्रियेत पशुवैद्यकांची भूमिका केंद्रस्थानी आहे.

### अ. अन्नसुरक्षा: सुरक्षित आणि दर्जेदार अन्न

अन्नसुरक्षा म्हणजे दूध, मांस आणि अंडी यांसारखे प्राणिजन्य पदार्थांमध्ये कोणतेही रोगजंतू, रसायने, प्रतिजैविके किंवा दूषित घटक नसणे.

- पशुवैद्यक केवळ दुधाळ जनावरांचे रोग दूर करत नाहीत, तर दुधातून होणारे संसर्ग टाळण्यासाठी लसीकरण आणि स्वच्छ दूध उत्पादनासाठी मार्गदर्शन करतात. अँटिबायोटिक वापरानंतर " विथड्रावल पिरिएड " पाळण्याची सूचना देतात यामुळे ग्राहकांना सुरक्षित दूध मिळते.
- कत्तलखान्यांमध्ये प्राण्यांची 'अँटी-मॉर्टम' आणि 'पोस्ट-मॉर्टम' तपासणी करून केवळ निरोगी मांसच बाजारात येईल याची खात्री पशुवैद्यकीय निरीक्षक करतात.यामुळे अन्नजन्य रोग टाळले जातात.
- स्वच्छता, जैवसुरक्षा उपाय, योग्य लसीकरण व अंडी हाताळणीबाबत पशुवैद्यकांचे मार्गदर्शन यामुळे अंडी सुरक्षित व पौष्टिक राहतात.
- अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स'(एएमआर) आज जगासमोर 'अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स' हे मोठे संकट आहे. जनावरांत अनावश्यक प्रतिजैविकांचा वापर केल्यास मानवामध्ये 'अँटीबायोटिक रेझिस्टन्स' निर्माण होतो. जनावरांमध्ये प्रतिजैविकांचा अनावश्यक वापर टाळून, सकस व रसायनमुक्त अन्न मानवापर्यंत पोहोचवण्याचे काम पशुवैद्यक करतात.
- अन्नजन्य रोग: अन्नजन्य रोगांमुळे दरवर्षी जगात ४.२ लक्ष मृत्यू होतात. अन्नजन्य आजारांपैकी सुमारे ३०% आजार हे प्राणिजन्य अन्नाशी संबंधित आहेत. त्यामुळे ही आकडेवारी दर्शवते की पशुवैद्यकांशिवाय अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे अशक्य आहे.

### ब.अन्नसुरक्षितता- सर्वांसाठी पुरेसे अन्न:

अन्नसुरक्षितता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला पुरेसे, परवडणारे आणि पोषक अन्न उपलब्ध असणे. पशुवैद्यक उच्च उत्पादक जातींची पैदास करणे, वेळीच रोगनियंत्रण उपाय अवलंबून रोगांमुळे होणारे नुकसान कमी करणे आणि प्रजनन कार्यक्षमतेत सुधारणाद्वारे ते अन्नसुरक्षितता देखील सुनिश्चित करतात, म्हणजेच सर्वांना पुरेसे आणि पोषक अन्न उपलब्ध राहते.

### क. अन्नसाखळीतील सुरक्षा:

अन्नसुरक्षा व अन्नसुरक्षितता ही केवळ उत्पादनापुरती मर्यादित नसून संपूर्ण अन्नसाखळीशी संबंधित आहे. पशुवैद्यक उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक, वितरण, उपभोग प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता व सुरक्षा सुनिश्चित करतात. त्यामुळे " प्रक्षेत्रावरून थेट थाळीपर्यंत" अन्न सुरक्षित राहते. पशुवैद्यकांच्या योगदानामुळे सुरक्षित व गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध होते, अन्नजन्य रोग कमी होतात, उत्पादन वाढते, अन्नटंचाई कमी होते व समाजाचे आरोग्य सुधारते. थोडक्यात पशुवैद्यक " प्रक्षेत्रातून थेट थाळीपर्यंत" या संपूर्ण अन्नसाखळीचे संरक्षक आहेत.




### 2. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षक•

प्राणिजन्य किंवा झूनोटिक आजार म्हणजे असे संसर्गजन्य रोग जे प्राण्यांकडून मानवाकडे पसरतात. आजच्या बदलत्या जीवनशैलीत, वाढत्या शहरीकरणात आणि मानव-प्राणी संपर्कात वाढ झाल्यामुळे अशा आजारांचा धोका अधिक वाढला आहे.

- ❑ मानवामध्ये आढळणाऱ्या संसर्गजन्य रोगां पैकी सुमारे ६०% रोग हे ' प्राणिजन्य ' असतात. सुमारे ७५% नवीन उद्भवणारे रोग प्राणिजन्य आहेत. दरवर्षी लाखो लोक प्राणीजन्य रोगामुळे बाधित होतात. यामध्ये रेबीज, ब्रुसेलोसिस, क्षयरोग, तसेच बर्ड फ्लू यांसारख्या गंभीर आजारांचा समावेश होतो.
- ❑ प्राणघातक रेबीज कुत्र्यांच्या चावण्यामुळे पसरतो, ब्रुसेलोसिस़- दूषित दूध / संपर्कातून पसरतो, बर्ड फ्लू - कुक्कुटपालनातून मानवात संक्रमण, क्षयरोग - काही प्रकरणांमध्ये प्राणिजन्य स्रोत. हे आजार केवळ जनावरांत नव्हे, तर मानवांतही जीवघेणे ठरू शकतात. त्यामुळे या रोगांवर नियंत्रण ठेवणे हे सार्वजनिक आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते आणि या लढाईत पशुवैद्यक अग्रस्थानी असतात.
- ❑ पशुवैद्यक प्राण्यांमधील रोग ओळखून त्यावर नियंत्रण ठेवतात, त्यामुळे रोग मानवां पर्यंत पोहोचण्यापूर्वीच थांबतो. प्राण्यांचे नियमित आरोग्य परीक्षण, संशयित रोगांचे लवकर निदान, संक्रमित प्राण्यांचे वेगळे व्यवस्थापन, रोग निगराणी आणि लवकर सूचना, नियमित लसीकरण मोहिम राबवणे, जनजागृती करणे, सार्वजनिक आरोग्य विभागा सोबत समन्वय ठेवून काम करणे, शेतकऱ्यांना प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे यामुळे रोगाचा प्रसार प्रारंभीच थांबतो.
- ❑ प्राणीजन्य रोग नियंत्रणासाठी “वन हेल्थ” दृष्टिकोन अत्यावश्यक आहे. मानवी आरोग्य हे प्राणी आणि पर्यावरण यांच्या आरोग्याशी अविभाज्य पणे जोडलेले आहे. या तिन्ही घटकांमध्ये संतुलन राखण्यासाठी पशुवैद्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.·

महामारी किंवा रोगप्रसाराच्या काळात पशुवैद्यक आपत्कालीन उपचार सेवा पुरवतात , रोग नियंत्रण उपाय राबवतात, जैवसुरक्षा सुनिश्चित करतात यामुळे मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान टाळता येते.·“प्राण्यांतील रोगांवर नियंत्रण म्हणजे मानवाचे संरक्षण आणि या संरक्षणाचे खरे शिल्पकार म्हणजे पशुवैद्यक.”

# लसीकरण कशासाठी?




गाई, म्हशी व शेळ्या-मेंढ्या हे पाळीव प्राणी घटसर्प, फऱ्या, फाशी व आंत्रविषार यांसारख्या साथीच्या रोगांमुळे तडकाफडकी मरतात. या रोगांची लागण झाल्यानंतर उपचार करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी, मौल्यवान जनावरे दगावल्यामुळे पशुपालकांचे फार मोठे नुकसान होते. लाळ्या-खुरकुत या रोगामुळे जनावरे सहसा मृत्युमुखी पडत नाहीत; परंतु या रोगामुळे विशेषतः संकरित गाई व म्हशी अनुत्पादक होतात किंवा त्यांची उत्पादन क्षमता घटते. पर्यायाने, पशुपालकास मोठा आर्थिक फटका बसतो.



डॉ. विशाल केचे
**पशुधन विकास अधिकारी**
**(कुक्कुट व आयटी हब), पसं-१३**
**पशुसंवर्धन आयुक्तालय औंध, पुणे-४११०६७**

**लसीकरणापुर्वी हे करा !**

* लसीकरण करण्याच्या १ आठवडा अगोदर अंतरपरजिवींच्या नायनाटासाठी जंतनाशक औषधे द्यावी.

* जनावरांचे शरीरावरील बाह्य परोपजींचा (उदा. गोचीड, गोमाशा, उवा, लिखा, पिसवा) नायनाट करण्यासाठी जनावरांकरिता वापरल्या जाणाऱ्या किटकनाशक औषधांची फवारणी करुन घ्यावी.

**लसीकरण करताना ही काळजी घ्या.**

- लस ही चांगल्या नामांकित कंपनीची असावी.
- लस खरेदी करताना त्यावरील एक्स्पायरी पाहून घ्यावी व त्या लसीचा बॅच नंबर नोंदवून ठेवावा.
- काही लसी (उदा. खुरी, श्वानदंश, धुनर्वात) औषधी दुकानातून आणत असताना थर्मासमध्ये किंवा कॅरिबॅगमध्ये बर्फावर ठेवून आणाव्यात व जनावरास देईपर्यंत बर्फातच ठेवाव्यात, बाहेर काढू नयेत.

- ❑ घरी लस आणल्यानंतर फ्रिज असेल तर लस फ्रिजमध्ये (वरचा म्हणजे बर्फाचा कप्पा सोडून) ठेवावी किंवा लस
- ❑ बाजारातून आणल्याबरोबर लगेच वापरुन टाकावी.
- ❑ लसीकरण हे निरोगी जनावरांनाच करावे.
- ❑ लसीकरण शक्यतो दिवसातील थंड वेळेत म्हणजे सकाळी किंवा सायंकाळी करावे.
- ❑ लसीकरण करताना लसीकरणाची सुई प्रत्येक वेळी पाण्यात उकळून निर्जंतूक करुन घ्यावी.
- ❑ फोडलेल्या बाटलीतील लस तशीच साठवून पुन्हा वापरु नये.
- ❑ लस योग्य जागेत व योग्य मार्गाद्वारे द्यावी.
- ❑ शक्यतो एकाच दिवशी एका गावातील सर्व जनावरांचे लसीकरण करुन घ्यावे.





**लसीकरणानंतर ही दक्षता घ्या...**

* बैलांना लसीकरणानंतर एक आठवडा हलके काम द्या.
* उत्तम रोगप्रतिकारकशक्तीसाठी चांगला आहार द्यावा.
* लसीकरणानंतर जनावरांचे अतिउष्ण व अतिथंड वातावरणापासून संरक्षण करावे. तसेच त्यांची लांबवर वाहतूक टाळावी.
* लसीकरणानंतर ताप अथवा प्रतिक्रिया काही अपाय घडू शकतात. मात्र, ते तात्कालिक व सौम्य स्वरुपाचेच असतात.

## पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ ही राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पाळीव प्राणी व पक्षी यांच्या साठी रोग प्रतिबंधात्मक लसीचे उत्पादन करणारी एकमेव राज्यस्तरीय संस्था आहे. ही संस्था सन १९६० पासून पुण्यातील औंध भागात कार्यरत आहे. संस्थेत पाळीव प्राणी व पक्षी यांना लागणाऱ्या जिवाणू लसी, विषाणू लसी, अभिकारके व द्रावणे तयार केली जातात. या लसी राज्यभरातील सर्व पशुवैद्यकीय संस्थाना, शेतकऱ्यांच्या व पशुपालकांच्या पशुधनास लसीकरण करण्यासाठी मोफत तत्वावर पुरवठा करण्यात येतात. या संस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या लसी सर्व राज्यस्तरीय आणि जिल्हा परिषद पशुवैद्यकीय संस्थाना विनामूल्य पुरविल्या जातात.




**१. लसीकरण केल्यास गाठी येतात का ?**

घटसर्प व फऱ्या रोगाची लस दिल्यानंतर काही जनावरांच्या मानेवर गाठी येतात, हे खरे. परंतु, गाठ येते म्हणून लसीकरण टाळणे अत्यंत चुकीचे आहे. गाठीमुळे प्राण्याचा जीव धोक्यात येत नाही. तसेच आता अनेक पशुपालकांना लसीची गाठ येते हे माहित झाल्याने ते बाजारात जनावरांची खरेदी-विक्री करताना गाठीस दोष अथवा बट्टा मानत नाहीत. लस दिल्यानंतर त्या जागेवर हलके चोळल्यास गाठ येण्याचे प्रमाण कमी होते. तसेच गाठीस कोमट पाण्याने शेकले तर गाठ जिरुन जाते.

**२. लसीकरणामुळे जनावरे गाभडतात का ?**

नाही. मात्र, काही अशक्त जनावरांत अगदी क्वचित म्हणजे १० हजारात एखाद्या जनावरात असा प्रकार घडू शकतो. तोही लस दिल्यानेच होतो, असे नाही. परंतु, जनावरांच्या जिविताचा विचार करता सर्व गाभण जनावरांना लस देणे उत्तम. विशेषतः आंत्रविषार व धुनर्वाताची लस ही गाभण शेळ्या मेंढ्यांना दिल्याने विण्याच्या सुमारास त्यांना व नवीन करडांना हे आजार होत नाहीत. कारण नवजात पिल्लांना चिकाद्वारे रोग प्रतिकारशक्ती मिळते. (अपवादानेही गाभण मेंढ्यांना देवी रोगाची लस देऊ नये.)

**३. लसीकरणामुळे दूध कमी होते का ?**

लसीकरणामुळे शरिरावर येणारा ताण किंवा लस दिल्यानंतर काही वेळेस येणारा हलकासा ताप यामुळे दूध उत्पादना कमी होवू शकते. मात्र, ते तात्कालिक असते.

**४. रोगांची साथ आल्यानंतर लसीकरण केले तर फायदा होतो का ?**

रोग होण्याची वाट न पाहता अगोदरच लसीकरण करावे, कारण लसीकरणामुळे रोग प्रतिकारकशक्ती येण्यास २ ते ३ आठवडे लागतात. त्यामुळे रोगाची साथ येण्याआधीच जनावरे रोगप्रतिकारक बनतात. साथ आल्यानंतर केलेल्या लसीकरणाचा फारसा उपयोग होत नाही.

**५. लसीकरण कुठल्या वयाच्या जनावरांत करावे?**

- घटसर्प व फऱ्या रोगाचे लसीकरण सहा महिन्याच्या वासरात व त्यापेक्षा मोठ्या वयाच्या जनावरात करावे.
- लाळ्याखुरकत रोगाची लस जर वासराच्या आईला दिली नसेल तर सहा ते आठ आठवडे वयाच्या वासरात व त्यापुढील जनावरांना लस द्यावी.
- आंत्रविषाराची लस पिलाच्या आईला दिली नसेल तर ती पिलांना पहिल्या आठवड्यात द्यावी व दिली असेल तर ४ ते ६ आठवडे वय झाल्यानंतर द्यावी.

**६. लसीकरण करुनही रोग होवू शकतो का ?**

नियमित लसीकरण केल्यानंतर घटसर्प, फऱ्या इ. रोग सहसा होत नाहीत. परंतु, लाळ्या खुरकत हा रोग लसीकरणानंतरही एखाद्यावेळी होवू शकतो. कारण या रोगाच्या विषाणूंच्या मुख्य ७ शिवाय ६० पेक्षा अधिक उपजाती आहेत. आपण दिलेल्या लसीत आपल्या भागात आढळणाऱ्या ३ ते ४ उपजाती समाविष्ट केलेल्या असतात. याशिवाय इतर उपजातीच्या विषाणूंचा प्रादुर्भाव जनावरांना झाल्यास लाळ्याखुरकत रोग होतो.

**७. लसीकरण दिल्यावरही रोग होण्याची कारणे कोणती ?**

* लसीची मात्रा योग्य प्रमाणात दिली न जाणे.
* साठवणूक योग्य पद्धतीने (थंड जागेत) केलेली नसणे.
* लसीकरणात अनियमितता असणे.
* लसीची मुदत संपल्यानंतर किंवा उरलेला लस वापरणे.
* जनावरांत अंतर व बाह्य परोपजीवींचा प्रादुर्भाव असणे.
* लस देतेवेळी जनावर अशक्त किंवा आजारी असणे.

**साथीचे रोग होवू नये म्हणून केव्हा लसीकरण करावे?**

**गाई-म्हशीतील लसीकरण**

❑ घटसर्प : एप्रिल मे महिन्यात वर्षातून एक वेळेस द्यावी. (संकरित गाई व म्हशीत वर्षातून दोन वेळेस द्यावी.)

❑ फऱ्या : एप्रिल-मे वर्षातून एक वेळेस द्यावी.

❑ फाशी: मे महिन्यात वर्षातून एकदा (रोग प्रादुर्भाव काळपुळी असलेल्या भागात)

❑ लाळ्याखुरकत: वर्षातून दोन वेळेस मार्च व सप्टेंबर महिन्यात (परंतु वर्षभर रोग प्रतिकारशक्ती टिकविणारी लस दिल्यास वर्षातून एक वेळेस सप्टेंबर महिन्यात)

**शेळ्या-मेंढ्यांमधील लसीकरण**

लस केव्हा व किती वेळेस द्यावी ?

❑ काळपुळी : वर्षातून एकदा फेब्रुवारी महिन्यात द्यावी. (रोगग्रस्त भागात)

❑ घटसर्प : वर्षातून एकदा मार्च महिन्यात द्यावी.

❑ आंत्रविषार : वर्षातून एकदा एप्रिल महिन्यात द्यावी. (दोन मात्रा १५ दिवसांच्या अंतराने)

❑ देवी : वर्षातून एकदा डिसेंबर महिन्यात द्यावी. (गाभण मेंढ्यांना ही लस देऊ नये.)

❑ फऱ्या : वर्षातून एकदा मे महिन्यात द्यावी.

**उपचारापेक्षा प्रतीबंध बरा**

**पशुधनाला नियमित लसीकरण करा.**

**संपर्क :**

नजीकचा पशुवैद्यकीय दवाखाना, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, जिल्हा परिषद-पशुसंवर्धन विभाग



# शेळीतील पैदास व्यवस्थापन





**डॉ. अनिल दि. पाटील**
प्राध्यापक व विभाग प्रमुख
पशुप्रजनन व प्रसूतीशास्त्र विभाग,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
मपमविवि, उदगीर, जि. लातूर - १७
भ्रमणध्वनीः ७५८८०६२५५६

शेळीपालन व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी पैदास व्यवस्थापन हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. योग्य पैदास नियोजनामुळे कळपाची गुणवत्ता सुधारते आणि पर्यायाने नफा वाढतो. तसेच यामध्ये शेळीची निवड व पैदास याचा संयोग करून पुढील व्यवस्थापन करणे आवश्यक असते. यात विशेष करून नराची निवड अत्यंत काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. त्याच्यापासून तयार होणारे भविष्यातील उत्पत्ती अतिशय उच्च प्रतीची सुधारणा होऊ शकते. या शास्त्रीय पद्धतीचा वापर करून अनुवंशिक गुणधर्म संक्रमित करू शकतो. शेळीपालन व्यवसाय करताना उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सुधारित प्रजनन व्यवस्थापन पद्धती तसेच तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज आहे. दोन वर्षांच्या कालावधीमध्ये पैदासक्षम शेळीचे तीन वेळा वेत झाले पाहिजे ह्या सूत्राचा अवलंब करणे गरजेचे आहे.



### शेळ्यांतील पैदास पद्धतीः

- शेळीपालनात प्रजनन व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रती शेळी मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होत नाही.
- प्रत्येक शेळीमध्ये आनुवंशिक संरचनेमध्ये भिन्नता असते. त्यामुळे पैदाशीकरिता निवड पद्धतीचा अवलंब करावा. यामध्ये उच्च वंशावळीचे गुणधर्म असणाऱ्या शेळ्या जसे
- जुळी किंवा तिळे पिल्ले देणे,
- पिल्लांमध्ये वजनवाढीचा वेग जास्त असणे,
- शेळ्यांना दूध जास्त असणे, दोन वेतामधील अंतर कमी असणे,
- पिल्लांचे जन्मताचे वजन जास्त असणे,
- गर्भधारणेचे प्रमाण जास्त असणे यासर्व बाबींचा विचार करून पैदाशीकरिता शेळ्यांची निवड करावी.
- पैदाशीचा बोकड जातिवंत असावा व त्यापासून भरविलेल्या शेळ्यांमध्ये जुळी किंवा तिळे पिल्ले होणे, शेळ्यांमध्ये गर्भपात न होणे, शेळ्या न उलटणे, सशक्त पिल्ले निपजणे हे चांगल्या नराचे गुणधर्म आहे. त्यानुसार निवड करून पैदाशीकरिता शेळ्या व बोकड कळपामध्ये ठेवावा.
- निरुपयोगी किंवा कमी प्रतीच्या शेळ्यांचा पैदाशीकरिता वापर टाळावा.
- शेळ्यांच्या दोन वेतामधील अंतर कमी करणे व करडांची चांगली वाढ होण्याच्या दृष्टिकोनामधून निवड पद्धतीचा अवलंब करावा.

### शेळ्यांची निवड

उत्तम पैदास ही चांगल्या नर आणि मादीच्या निवडीवर अवलंबून असते.

### मादी शेळीची निवडः

- शेळी किमान १० ते १२ महिने वयाची आणि २०-२५ किलो वजनाची असावी.
- ती धष्टपुष्ट व आरोग्याने चांगली असावी.
- शेळी आकाराने मोठी असावी.
- मान लांब असावी.
- डोळे पाणीदार असावेत.
- शांत वृत्तीची असावी.
- केस मऊ व चमकदार असावेत.
- छाती भरदार असावी.
- खांद्यापासून पुठ्यापर्यंत भाग सरळ रेषेत असावा.
- पाय सरळ असावेत.
- कासेचा आकार व सड निरोगी असावेत.
- तीन करडे किंवा पिल्ले देणारी असावी.



### नराची (बोकडाची) निवडः

- बोकड हा उंच, मजबूत बांध्याचा आणि मादीपेक्षा वेगळ्या रक्ताचा (Outbreeding) असावा. एका बोकडावर साधारण २० ते २५ शेळ्यांचे नियोजन करावे.
- बोकडाची छाती भरदार असावी.
- दोन्ही पायांत भरपूर अंतर असावे.
- शेळ्यांचा माज ओळखणे.
- शेळी दर १८ ते २१ दिवसांनी माजावर येते.
- माजाची लक्षणे साधारण २४ ते ३६ तास टिकतात.

### माजाची प्रमुख लक्षणेः

- शेळी सतत ओरडते.
- शेपटी सारखी हलवते.
- दुसऱ्या शेळीवर चढण्याचा प्रयत्न करते.
- योनीमार्गातून पारदर्शक चिकट स्त्राव येतो.
- भूक कमी होते आणि दूध उत्पादनात घट येते.

### रेतन करण्याची योग्य वेळ

शेळी माजावर आल्यानंतर १० ते १५ तासांनी रेतन करणे सर्वात फायदेशीर ठरते. शक्य असल्यास, पहिल्यांदा रेतन केल्यानंतर ८-१० तासांनी पुन्हा एकदा बोकड दाखवावा, जेणेकरून गाभण राहण्याची शक्यता वाढते.

### एकाच वेळी माजावर आणण्याचे तंत्रः

- एकाचवेळी शेळ्या माजावर आणण्याच्या तंत्राचा अवलंब करून कळपातील बहुतांश शेळ्या एकाच वेळी माजावर आल्यास सुधारित रेतन पद्धतीचा अवलंब करण्यास फायदेशीर होऊ शकते.
- याकरिता काही संप्रेरकाचा वापर करून शेळ्या एकाचवेळी माजावर आणण्याचे तंत्र वापरण्यात येते.
- ४८ ते ७२ तासामध्ये बहुतांशी शेळ्या माज दाखवतात.
- त्यानंतर शेळ्या कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिक रेतन पद्धतीने भरविल्या जातात.
- या पद्धतीचा अवलंब पशुवैद्यकाच्या मार्गदर्शन व देखरेखीखाली करणे आवश्यक आहे.

### शेळयांतील कृत्रिम रेतनः

- याकरिता उच्च वंशावळीच्या बोकडाचे वीर्य संकलित करून कृत्रिम रेतन पद्धतीचा अवलंब केल्यास चांगले आनुवंशिक गुणधर्म असलेली पिढी निर्माण होऊ शकते.
- कृत्रिम रेतन केल्यामुळे चांगले जातिवंत बोकडाच्या विर्याचा वापर होऊन उच्च दर्जाच्या शेळ्या तयार होऊ शकतात. तसेच प्रजननापासून प्रसारित होणाऱ्या आजारांचे संक्रमण थांबविण्यास सुद्धा मदत होऊ शकते.
- कृत्रिम रेतन आपण दोन प्रकारे करू शकतो, गोठविलेल्या रेत मात्रा वापरून किंवा बोकडाचे ताजे वीर्य वापरून कृत्रिम रेतन करता येऊ शकते.
- या पद्धतीचा अवलंब करण्याकरिता याबाबतचे प्रशिक्षण घेणे किंवा तज्ञ पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली कृत्रिम रेतन करणे फायदेशीर ठरते.





### कृत्रिम रेतनाचे फायदे

- ❑ संपूर्ण शेळ्यामध्ये उच्च वंशावळी अनुवांशिकतेचा प्रसार व वाढ करण्याचा कृत्रिम रेतन हा सर्वोत्तम मार्ग आहे.
- ❑ कृत्रिम रेतन द्वारे, कळपातील अनुवांशिक सुधारणा नैसर्गिक रेतन पेक्षा जलद आहे.
- ❑ मोठ्या कळपात त्याचा उपयोग केला जाऊ शकतो.
- ❑ वीर्य अधिक काळासाठी अतिशीत कक्षात जतन केले जाऊ शकते. म्हणून, बोकडाच्या मृत्यू नंतरही, त्यांचे वीर्य कृत्रिम रेतन कार्यक्रमात वापरले जाऊ शकते.
- ❑ कृत्रिम रेतन रोगनियंत्रणासाठी प्रभावी साधन आहे.
- ❑ लैंगिक रोगांचे संक्रमण होण्याचे प्रमाण कमी आहे

### मर्यादाः

- ❑ कृत्रिम रेतनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि विशेष उपकरणे आवश्यक आहेत.
- ❑ बोकड आणि शेळी मधील जननेंद्रियाच्या संरचनेचे आणि कार्याची माहिती असणे आवश्यक आहे.
- ❑ उपकरणांची अयोग्य स्वच्छता आणि अस्वच्छ परिस्थितीमुळे प्रजनन क्षमता कमी होऊ शकते व इतर रोगांचा प्रसार होऊ शकतो.
- ❑ कृत्रिम रेतन साठी विशेष सुविधा असणे आवश्यक असते

### कृत्रिम रेतन प्रक्रिया झाल्यानंतर खालील नोंदी ठेवाः

- ❑ माजाचा दिवस आणि वेळ
- ❑ कृत्रिम रेतनची तारीख आणि वेळ
- ❑ शेळीची जात आणि बोकडाची आयडी

### अनुवंशिक सुधारणा आणि रक्तबदलः

- ❑ एकाच कळपातील बोकड सतत वापरल्यास 'इनब्रीडिंग' मुळे पिल्ले कमकुवत जन्मतात. हे टाळण्यासाठी दर १.५ ते २ वर्षांनी कळपातील बोकड बदलावा.
- ❑ किंवा दुसऱ्या ठिकाणाच्या बोकडाशी अदलाबदल करताना त्याची प्रजननविषयक संपूर्ण माहिती घ्यावी.
- ❑ आऊटब्रीडिंग या पैदास पद्धतीत नाते संबंध नसलेल्या शेळयांचे प्रजनन केले जाते. या प्रकारच्या पैदास पद्धतीमुळे निर्माण होणारे करडे नक्कीच चांगल्या प्रतीचे होतात.
- ❑ **गट प्रजनन प्रणालीः** या पद्धतीमध्ये जातिवंत बोकड आणि शेळ्या कळपा कळपातून बदलण्यात येतात. ह्या पद्धतीचा वापर करण्यासाठी नियोजित कळप निवड करण्याची आवशक्यता असते. या प्रकारात वेगवेगळे तीन स्तर असतात. पहिला स्तर अत्यंत जातिवंत अशा चांगल्या शेळ्यांचा असतो. दुसऱ्या स्तर म्हणजे पशु पशुपालकडील शेळ्यांचा कळप. नर व मादी दुसऱ्या स्तरात वेळोवेळी हस्तांतररत करण्यात येतात. तिसऱ्या स्तरात लहान कळप असलेले पशुपालक. तिसऱ्या स्तरातील पशुपालकाने दुसऱ्या स्तरातील पशुपालकाकडून शेळ्या घेणे अपेक्षित असते.

### शेळीपालनातील अर्थशास्त्र (Tips for Profit)

- ❑ **जुळी करडेः** शिरोही, उस्मानाबादी किंवा संगमनेरी यांसारख्या जाती निवडा ज्यांच्यात जुळी करडे देण्याचे प्रमाण जास्त आहे.

**योग्य वेळी विक्री:** बोकड साधारण ८ ते १० महिन्यांचे (३०-३५ किलो वजन) झाल्यावर त्यांची विक्री करणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते.

**पाणीः** शेळ्यांना स्वच्छ आणि ताजे पाणी चोवीस तास उपलब्ध असावे.

**खाद्यः** सतत संतुलित आहाराचा पुरवठा करावा.

**गोठा:** गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर असावा. लाकडाचा किंवा इतर साधनाचा वापर करून शक्य असल्यास 'उंच खाचरावरील गोठा' पद्धत वापरावी.

# मराठवाड्याची शान : जाणवळ पश्मी श्वान



जाणवळ पश्मी हा मध्यम आकाराचा श्वान असून तो प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील लातूर व लगतच्या जिल्ह्यातील गावांमध्ये आढळतो. या श्वानाविषयी उपलब्ध साहित्यात फारशी माहिती नसल्यामुळे, या जातीचा शास्त्रीय अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदर संशोधन हाती घेण्यात आले होते. या अभ्यासासाठी जाणवळ पश्मी श्वानाच्या प्रजनन क्षेत्रातून एकूण 373 श्वानाची शारीरिक मोजमापांची माहिती (morphometric data) संकलित करण्यात आली.



**डॉ.पंडीत नांदेडकर**
**सहयोगी प्राध्यापक**
**पशु अनुवंश व पैदास विभाग समन्वयक,**
**परभणी पशुवैद्यकीय महाविद्यालय**

संकलित माहिती दोन वयोगटांत वर्गीकृत करण्यात आली:

**एक वर्षाखालील (पिल्ले) व एक वर्षावरील (प्रौढ).**

बहुसंख्य श्वानाचा रंग काळा (७८.२६%) आढळून आला. याशिवाय फिकट तपकिरी / फॉन (८.६९%), तपकिरी (४.३४%), करडा (५.७९%) व पांढरा (२.८९%) असे रंगही आढळले. केसांची लांबी बहुतेक श्वानामध्ये मध्यम (५१.२०%), त्यानंतर लांब (४३.४७%), तर फारच कमी प्रमाणात लहान (५.३१%) आढळली. डोक्याचा आकार प्रामुख्याने सरळ (६९.५६%) व काही प्रमाणात त्रिकोणी / वेज-आकाराचा (३०.४३%) होता.

बहुसंख्य श्वानाच्या नाकपुड्यांचा रंग काळा (९५.१६%) असून, फारच थोड्या श्वानामध्ये तपकिरी (३.८६%) व गुलाबी (०.९६%) रंग आढळून आला. डोळ्यांचा रंग फिकट तपकिरी (४७.३४%) ते गडद तपकिरी (५२.६५%) असा होता.

कानांची लांबी अत्यल्प प्रमाणात (३.३८%) लहान आढळली. बहुसंख्य श्वानामध्ये लांब कान (५४.५८%), तर मध्यम आकाराचे कान (४२.०२%) आढळून आले.

अभ्यासात खालील शारीरिक मोजमापांचा समावेश करण्यात आला: शरीर वजन (BW) कि.ग्रॅ., खांद्याजवळील उंची (HW), शरीराची लांबी (BL), छातीचा घेर (CG), पोटाचा घेर (PG), शेपटीची लांबी (TL), डोक्याची लांबी (HL), शेपटीच्या मुळाशी उंची (HBT), मानेची लांबी (NL), मानेचा घेर (NG), कानांची लांबी (EL), कानांची रुंदी (EW), डोळ्यांची रुंदी (EYW), मागील पायाची लांबी (HFL), वरच्या मागील पायाची लांबी (UHLL), खालच्या मागील पायाची लांबी (LHLL), पुढील पायाची लांबी (FFL), वरच्या पुढील पायाची लांबी (UFLL) आणि खालच्या पुढील पायाची लांबी (LFLL) आदि मोजमापे सेंटीमीटरमध्ये नोंदविण्यात आली. पिल्लांच्या गटात लिंगाचा प्रभाव बहुतेक सर्व गुणधर्मांवर अमहत्त्वपूर्ण (non-significant) आढळून आला; मात्र शरीर वजन (BW), खांद्याजवळील उंची (HW), शेपटीच्या मुळाशी उंची (HBT), मानेची लांबी (NL), वरच्या मागील पायाची लांबी (UHLL) व वरच्या पुढील पायाची लांबी (UFLL) या गुणधर्मांवर लिंगाचा महत्त्वपूर्ण प्रभाव दिसून आला.

प्रौढ गटात नर श्वानामध्ये BW, HW, BL, CG, TL, HL, HBT, NL, NG, HFL, UHLL, LHLL, FFL व UFLL ही मोजमापे मादी श्वानापेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आढळली. श्वानाना शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारचे खाद्य दिले जात असून, बहुसंख्य शेतकरी लोखंडी जाळीच्या पिंजऱ्यांचा वापर कुत्र्यांच्या निवासासाठी करत असल्याचे आढळून आले. या अभ्यासाच्या आधारे असे निष्कर्ष काढण्यात आले की, जाणवळ पश्मी श्वानाची स्वतंत्र जात म्हणून नोंदणी करणे व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.



# पशु वनौषधी - वनस्पती उद्यान :
# जिवंत ग्रंथालय



**सध्या 'अँटी-मायक्रोबियल रेसिस्टन्स' (AMR) हा जागतिक आरोग्य विभागासमोर एक गंभीर पेच बनला आहे. जेव्हा संसर्गजन्य आजारांवर वापरली जाणारी प्रतिजैविके (Antibiotics), बुरशीनाशके (Anti-fungal) व विषाणूरोधक (Anti-viral) औषधे मानवी किंवा प्राण्यांच्या शरीरात काम करेनाशी होतात, तेव्हा त्या स्थितीला AMR असे म्हणतात. या प्रक्रियेमुळे साधे संसर्गदेखील जीवघेणे ठरु शकतात. पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे या समस्येची गांभीर्याने दखल घेतली आहे. विशेषतः न्युमोनिया व मूत्रनलिकेचे आजार औषधांना दाद देत नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. औषधांच्या अतिवापरामुळे उद्भवलेली ही समस्या निवारण्यासाठी 'पशु वन औषधी' वनस्पतींचे जिवंत ग्रंथालय म्हणून ओळखले जाणारे उद्यान भविष्यात दिशादर्शक ठरेल.**



**डॉ. स्मिता जिंतूरकर**
**सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन ( से.नि. )**
**गुणनियंत्रण प्रयोगशाळा**
**आरे, गोरेगाव, मुंबई 65**

मानवामध्ये व्हायरल इन्फेक्शन करिता antimicrobial चा अतिवापर किंवा निरोगी जनावरांत रोग प्रतिबंधक उपाय म्हणून तसेच पिकांना कीड लागू नये म्हणून antimicrobials चा अतिरेकी वापर केल्यामुळे AMR होत आहे. जगातल्या एकूण antimicrobials पैकी ७३% हे मांस, अंडी, दूध देणाऱ्या / माणसाला अन्न पुरविणाऱ्या जनावरांमध्ये वापरले जाते. त्यांचे अंश मांसातून, अंड्यातून / दुधातून आपल्या शरीरात, व पर्यायाने संपूर्ण इको सिस्टीममध्ये झिरपते!



मानवाच्या प्रथिनांची गरज भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्राणीजन्य उत्पादनांचा वापर होतो. याच साखळीतून, तसेच पीक-पाणी, दूध, मांस आणि अंडी यांमार्फत 'अँटी-मायक्रोबियल' घटक मानवी शरीरात व पर्यावरणात मिसळत आहेत. यामुळेच निर्माण होणाऱ्या 'अँटी-मायक्रोबियल रेसिस्टन्स' (AMR) या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी आता आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन व पर्यावरण या सर्व विभागांना 'वन हेल्थ अप्रोच' अंतर्गत एकत्र येणे अनिवार्य झाले आहे. या संकटावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने 'नॅशनल ॲक्शन प्लॅन' (NAP-AMR २०२५-२०२९) तयार केला आहे. यानुसार, विशेषतः ब्रॉयलर पोल्ट्रीमध्ये केवळ वजन वाढवण्यासाठी किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून प्रतिजैविकांचा (Feed Additives) वापर करण्यावर कडक निर्बंध घातले आहेत. त्याऐवजी, 'इथ्नो-व्हेटर्नरी मेडिसिन' म्हणजेच पारंपरिक आयुर्वेदिक औषधांच्या वापराला प्रोत्साहन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' (NDDB) ने या विषयावर सखोल संशोधन केले असून, आयुर्वेदिक औषधी हा प्रतिजैव-कांना सक्षम पर्याय असल्याचे सिद्ध केले आहे. २०२६ चे पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. पुण्यमूर्ती नटेशन यांनी गेल्या ४ दशकांपासून 'सायंटिफिक इथ्नो-व्हेटर्नरी मेडिसिन'वर काम करून प्रतिजैविक विरहित दूध व मांस उत्पादनासाठी ग्रामीण भागात मोठी क्रांती घडवून आणली आहे.

आपल्याकडे मानवाप्रमाणेच पशुधनासाठीही वनौषधींचा मोठा साठा व जैवविविधता उपलब्ध आहे. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे अंगण, तिथली झाडे व 'आजीबाईंचा बटवा' काळाच्या ओघात हरवत चालला आहे. आज आयुर्वेदाला पुनरुज्जीवित करण्यात सर्वात मोठी अडचण म्हणजे औषधी वनस्पतींची ओळख पटवणे. प्रत्येक पिढीगणिक हे पारंपरिक ज्ञान कमी होत चालले आहे.

'वृंदावन' पशु वनौषधी उद्यान: एक जिवंत ग्रंथालय

औषधी वनस्पतींची प्रत्यक्ष ओळख व्हावी, त्यांचे गुणधर्म जाणून घेता यावेत व या ज्ञानाचे जतन व्हावे, या उद्देशाने मुंबईतील आरे (गोरेगाव) येथील गुणनियंत्रण प्रयोगशाळा परिसरात 'वृंदावन पशु वनौषधी-वनस्पती उद्यान' साकारण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही शासकीय निधीशिवाय, लोकसहभाग, खासगी कंपन्या आणि सेवाभावी संस्थांच्या मदतीने पाऊण एकर ओसाड जागेचा कायापालट करून हे नंदनवन उभे राहिले आहे.

**उद्यानाची वैशिष्ट्ये:**

- येथे ७ प्रकारच्या २६० तुळशींची रोपे (वृंदा) आणि सुमारे २५० प्रजातींच्या ३,००० हून अधिक औषधी वनस्पती व देशी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.
- पशुसंवर्धन क्षेत्रात सुरक्षित, शाश्वत आणि अंशविरहित अन्न उत्पादनाला चालना देणे.
- नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन करणे.

**भविष्यातील दृष्टीकोन व उपयोग**

हे उद्यान केवळ एक रोपवाटिका नसून, ते वनौषधींची ओळख, प्रक्रिया आणि वापर शिकवणारे एक 'प्रात्यक्षिक केंद्र' आहे. या उपक्रमामुळे खालील फायदे साध्य होतील:

१.विद्यार्थी, पशुवैद्यकीय अधिकारी आणि संशोधकांना वनस्पतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळेल.

२.पारंपरिक ज्ञानाचे प्रमाणीकरण करून ते पुढच्या पिढीसाठी जतन केले जाईल.

३.पशुपालकांना स्वस्त व पर्यावरणपूरक उपचार पद्धती उपलब्ध होतील.

४. पशुवैद्यकीय संस्थांना येथून बी-बियाणे व रोपे पुरवून हे ज्ञान थेट शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचवले जाईल.



या उपक्रमासाठी मा. डॉ. रामास्वामी एन., भा.प्र.से., सचिव (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच मा. पद्मश्री. डॉ. पुण्यमुर्ती नटेशन (Scientific Ethno-Veterinary Medicine ) मा. डॉ. आर. ओ. गुप्ता, वरिष्ठ महाव्यवस्थापक ( Productivity Enhancement ) N.D.D.B. आणंद यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

खालील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वृंदावन पशु वनऔषधी-वनस्पती उद्यान मूर्त स्वरूपात आले आहे:

- मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे, भा.प्र.से., आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
- मा. डॉ. देवेंद्र सुरेश जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग नियंत्रण व गुण नियंत्रण, प. सं. आयुक्तालय, पुणे
- मा. डॉ. प्रशांत उषा धनंजय कांबळे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, कोकण भवन
- मा. डॉ. विजय पुष्पा तुकाराम सावंत, उपआयुक्त पशुसंवर्धन, गुण नियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, मुंबई

राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (N.D.D.B.), आणंद (गुजरात); सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, मुंबई; संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली, मुंबई; मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव; अलाना सन्स प्रा. लि.; एम.यु.एन. ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि.; महा इन्फोटेक प्रा. लि. (तंत्रज्ञान सल्ला सेवा); आत्मन अॅकडमी; माऊली औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती प्लांट सप्लायर या सर्वांनी आवश्यक ते तांत्रिक, समन्वयात्मक सहकार्य व संसाधनांची मदत पुरवून या उपक्रमात मोलाचे योगदान दिले आहे.



# जागतिक तापमानवाढ व दुभत्या गायींवरील उष्णतेचा ताण: आव्हाने व उपाय

**हवामान व पशुधन यांच्यातील संबंध अत्यंत गुंतागुंतीचा आणि द्विदिशात्मक आहे. एकीकडे गायी मिथेन व कार्बन डायऑक्साइड यांसारखे हरितगृह वायू उत्सर्जित करून जागतिक तापमानवाढीला हातभार लावतात, तर दुसरीकडे वाढत्या तापमानाचा थेट परिणाम त्यांच्या शरीरक्रिया व कार्यक्षमतेवर होत आहे. भारताकडे जगातील सर्वाधिक गोवंश असल्याने, हरितगृह वायू उत्सर्जनात भारताचा वाटा असल्याचा दावा केला जातो. त्यामुळे हे उत्सर्जन कमी करणे व बदलत्या हवामानानुसार पशुधनाचे व्यवस्थापन करणे हे भारतापुढील मोठे आव्हान आहे.**



**डॉ. अब्दुल समद,**
**माजी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय विज्ञान विद्याशाखा व शिक्षण संचालक,**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ**

आज जागतिक तापमानवाढ हे एक भीषण वास्तव बनले आहे. उन्हाळ्यात भारताच्या अनेक भागांत तापमान ४५°C ते ४८°C पर्यंत पोहोचते. सर्वसाधारणपणे, गायींसाठी १२°C ते ३२°C तापमान व ६५% ते ७५% आर्द्रता असणारे वातावरण आरामदायक मानले जाते. गायींवरील उष्णतेचा परिणाम मोजण्यासाठी केवळ तापमान पुरेसे नसून 'तापमान-आर्द्रता निर्देशांक' (Temperature-Humidity Index - THI) मोजणे आवश्यक आहे.



### उष्णतेच्या ताणाचे परिणाम

जेव्हा THI धोक्याची पातळी ओलांडतो, तेव्हा गायींमध्ये (विशेषतः संकरित जातींमध्ये) खालील लक्षणे दिसू लागतात:

- श्वास घेण्यास त्रास होणे व लाळ गळणे.
- चारा व पाण्याचे प्रमाण कमी होणे.
- तीव्र ताप व अतिसार (काही वेळा रक्तासह).
- रक्ताच्या गुठळ्या होण्याचे विकार; प्रसंगी मृत्यू.

या ताणामुळे दूध उत्पादनात ५०% पर्यंत घट होऊ शकते. तसेच, शरीरातील नकारात्मक ऊर्जा संतुलनामुळे गायी माजावर येण्याचे प्रमाण कमी होते, ज्याचा थेट परिणाम प्रजनन क्षमतेवर होतो. भारतीय देशी गायींमध्ये उष्णतेचा त्रास संकरित गायींइतका तीव्र नसला तरी, त्यांच्यातही उत्पादन व प्रजनन क्षमतेत घट दिसून येते.

### निवारण व उपाययोजना

उष्णतेच्या ताणापासून पशुधनाचे रक्षण करण्यासाठी तीन मुख्य मार्ग आहेत:

१. गोठ्यांच्या रचनेत व निवाऱ्यात सुधारणा करणे.

२. चारा व पाण्याच्या उपलब्धतेत बदल करणे.

३. अनुवांशिकरित्या उष्णता सहनशील असलेल्या जाती विकसित करणे.

### उष्णता सहनशील जातींचा विकास आणि संशोधन

या लेखाचा मुख्य भर उष्णता सहनशील गायींच्या विकासावर आहे. सन १९९४ पासून संशोधकांनी निरीक्षण केले की, काही विशिष्ट गायी तीव्र उष्णतेतही स्वतःला अनुकूल करून घेतात. २००० सालापर्यंत जनुकीय क्रमनिर्धारण तंत्रज्ञानाअभावी यावर मर्यादा होत्या, मात्र आता CRISPR-Cas सारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे 'सिंगल जीन ट्रान्स्फर' (Single Gene Transfer) करून उष्णता सहनशील जाती विकसित करणे शक्य झाले आहे.

### जागतिक प्रयत्न व भारताची स्थिती•

**ऑस्ट्रेलिया, अमेरिका व ब्राझील:** या देशांनी मांसल उत्पादनासाठी (Beef) सेनेपोल आणि ब्राह्मीण सारख्या जातींचा वापर करून उष्णता सहनशील संकरित जाती विकसित केल्या आहेत. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियन सेनेपोल ही जात शिंगविरहित ऑस्ट्रेलियन गाय व नदामा यांच्या संकरातून तयार झाली आहे.·

**भारत:** भारतात आपले पूर्ण लक्ष केवळ दूध उत्पादन वाढवण्यासाठी संकर करण्यावर राहिले आहे. परिणामी, उष्णता सहन करू शकणाऱ्या जातींच्या विकासाला अपेक्षित प्राधान्य मिळालेले नाही. वाढत्या तापमानाचा विचार करता, भविष्यात केवळ उच्च दूध उत्पादन देणाऱ्या गायी असून चालणार नाही, तर त्या बदलत्या हवामानाशी जुळवून घेणाऱ्या असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शाश्वत दुग्धव्यवसायासाठी उष्णता सहनशील जनुकांचा वापर करून नवीन जाती विकसित करणे ही काळाची गरज आहे.

मिनियापोलिस भेटीदरम्यान 'ॲक्सिलजेन' (Acceligen) कंपनीच्या एका महत्त्वपूर्ण प्रयोगाबद्दल समजले. त्यांनी 'CRISPR-Cas' तंत्रज्ञानाचा वापर करून कॅरिबियन गायींमधील SLICK (उष्णता सहन करणारे) जनुक जास्त दूध देणाऱ्या HF (Holstein Friesian) गायींमध्ये यशस्वीरित्या स्थानांतरित केले होते. मी व चितळे डेअरीचे विश्वास चितळे यांनी त्या कंपनीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात यश आले नाही. परदेशी तंत्रज्ञान आयात केल्यास प्रत्येक वीर्य स्ट्रॉवर मोठी रॉयल्टी द्यावी लागेल, अशी भीती आम्हाला होती. म्हणूनच,

### उष्णता सहनशील गाय ओळख मोहीम:

या मोहिमेला गती देण्यासाठी 'बॉम्बे गौरक्षक मंडळी फाऊंडेशन' (BGMF) या १४० वर्षे जुन्या संस्थेशी संपर्क साधला. त्यांनी यापूर्वी 'लंपी' रोगाच्या काळात विकसित केलेल्या 'नॅनो-मिथिलीन ब्लू' उपचारासाठी मदत केली होती. याही प्रकल्पासाठी त्यांनी आनंदाने निधी उपलब्ध करून दिला.

भारताच्या भौगोलिक परिस्थितीत अशा गायी नैसर्गिकरित्या उपलब्ध आहेत का, याचा शोध घेण्याचे ठरवले.

SLICK जनुक व स्थानिक सर्वेक्षण संशोधनातून असे समोर आले की, प्रोलॅक्टिन हार्मोनच्या रिसेप्टरमध्ये होणाऱ्या उत्परिवर्तनामुळे (Mutation - सजीवांच्या पेशींमधील DNA (अनुवांशिक द्रव्य) च्या संरचनेत किंवा न्यूक्लिओटाइड क्रमात अचानक होणारा कायमस्वरूपी बदल) गायींमध्ये उष्णता सहन करण्याची शक्ती निर्माण होते. अशा गायींच्या अंगावर लहान, दाट व गुळगुळीत केस असतात, म्हणून त्यांना 'स्लिक' (SLICK) असे नाव देण्यात आले आहे.

सन २०२४ च्या उन्हाळ्यात, जेव्हा पारा ४५°C च्या पुढे होता, तेव्हा संगमनेर परिसरात दौरा केला. तेथे अशा काही गायी आढळल्या ज्या कडक उन्हातही अत्यंत शांत व आरामदायक स्थितीत उभ्या होत्या, तर इतर गायी गोठ्यात असूनही धापा टाकत होत्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, यातील चार गायी भरपूर दूधही देत होत्या. यामुळे 'क्रिसपर' तंत्रज्ञानाचा वापर न करता नैसर्गिकरित्या निवड पद्धतीने (Phenotype Selection) काम करण्याची मोठी संधी समोर आली.





महाराष्ट्रातून पुरस्कार विजेती SLICK सकारात्मक गाय

आम्ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी एक व्हॉट्सअॅप मोहीम सुरू केली. ज्या गायी २० लिटरपेक्षा जास्त दूध देतात आणि उन्हाचा ताण सहन करतात, त्यांचे व्हिडिओ पाठवण्याचे आवाहन करण्यात आले. नमुना संकलन व प्रयोगशाळा चाचणी नमुने गोळा करण्यासाठी आम्ही एक अभिनव 'सेल्फ-डूइंग किट' विकसित केले. शेतकऱ्यांना प्रयोगशाळेत येण्याची गरज पडू नये म्हणून विशेष फिल्टर पेपर तयार करण्यात आला.

शेतकऱ्यांनी फक्त:

१. गायीच्या कानाला सुईने टोचून रक्ताचे दोन थेंब त्या पेपरवर घेणे.
२. केसांचे काही नमुने गोळा करणे.
३. ३. दिलेला लिफाफा पोस्टाने प्रयोगशाळेत पाठवणे.

❑ पहिली 'SLICK-१' पॉझिटिव्ह गाय दिवसाला ३२ लिटर दूध देत होती.
❑ दुसरी गाय २७ लिटर तर इतर २०-२५ लिटर दूध देत होत्या. त्यांची त्वचा व केसांचे स्वरूप जागतिक स्तरावर नोंदवलेल्या स्लिक गायींसारखेच होते.

सन २०२६-२७ वर्षामध्ये आगामी उन्हाळी हंगामात किमान ५० स्लिक-पॉझिटिव्ह गायी ओळखण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. पुढच्या टप्प्यात आम्ही खालील गोष्टींवर भर देणार आहोत:

❖ **पैदास चाचणी:** हे जनुक पुढील पिढीत संक्रमित होते का, याचा अभ्यास करणे.
❖ **प्रगत चाचणी:** मोठ्या प्रमाणावर तपासणीसाठी 'मल्टिप्लेक्स QRT-PCR' तंत्र विकसित करणे.
❖ **प्रमाणीकरण:** त्रयस्थ संस्थेद्वारे निकालांची पडताळणी करणे.

भारताकडे असलेल्या जनुकीय विविधतेचा वापर करून आपण स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करू शकतो. शेतकरी, संशोधक, पशुवैद्यक व उत्पादक यांनी एकत्र येऊन काम केल्यास आपण जागतिक दर्जाचे 'मेक इन इंडिया' संशोधन अत्यंत कमी खर्चात पूर्ण करू शकतो.



# पशु-पक्षी खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर (पुणे)

## पशुधनाच्या समृद्धीसाठी गुणवत्तेचा आधारस्तंभ

पशुपालन व कुक्कुटपालन हा ग्रामीण, तसेच निमशहरी भागातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. या व्यवसायाची यशस्विता ही प्रामुख्याने जनावरांच्या आरोग्यावर व त्यांना मिळणाऱ्या आहारावर अवलंबून असते. याच उद्देशाने, पशुधनाला सकस आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत पशु-पक्षी खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर, पुणे - १६ ही राज्यस्तरीय संस्था कार्यरत आहे. ही प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खाद्य व चाऱ्याचे अचूक विश्लेषण करणारी राज्यातील एकमेव अग्रगण्य संस्था आहे.



डॉ. प्रदीप तोडमल
पशुधन विकास अधिकारी
पशु-पक्षी खाद्य विश्लेषण
प्रयोगशाळा, गोखलेनगर, पुणे

### संस्थेची स्थापना व ऐतिहासिक पार्श्वभूमी

या राज्यस्तरीय संस्थेची पायाभरणी व विस्तार खालील शासन निर्णयानुसार झाला आहे:

१. **दुग्ध व सहकार विभाग शासन निर्णय:** क्रं. एसडी एस / ४५७८ / दिनांक १० मे १९५८.

२. **पशुसंवर्धन संचालनालय पत्र:** क्रं. डी एस पी /७६८/ -७०/ दिनांक २८ एप्रिल १९७०.

३. **महसूल विभाग शासन निर्णय:** क्रं. १५५०/ ९८/७ दिनांक २० नोव्हेंबर १९७०.

**प्रयोगशाळेची मुख्य उद्दिष्टे व कार्यपद्धती**

- **एकमेव राज्यस्तरीय संस्था:** ही प्रयोगशाळा पशूपक्षी खाद्य, खाद्य घटक, हिरवी वैरण, वाळलेली वैरण, मुरघास व खनिज मिश्रणे इत्यादींच्या नमुन्यांचे अचूक विश्लेषण करणारी एकमेव राज्यस्तरीय शासकीय संस्था आहे.
- **आधुनिक यंत्रसामुग्री:** संस्थेमध्ये अत्यंत अत्याधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री उपलब्ध असून त्याद्वारे अचूक व बिनचूक निष्कर्ष काढले जातात.
- **ऑनलाईन सेवा:** 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' (शा.नि.क्र. कृवपदुम ३३०३० /२५ /२०२३/ एमएजी/पदुम-४ (६५१३०६) दि. ०९/०१/२०२४) अंतर्गत या प्रयोगशाळेतील सेवा आता पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने व विहित कालमर्यादेत पुरवल्या जातात.
- **शुल्क सवलत:** राज्य शासकीय संस्थेकडून अथवा शासकीय योजनेमार्फत पुरवठा झालेल्या पशुखाद्य नमुन्यांच्या विश्लेषणासाठी पशुसंवर्धन खात्याच्या संस्थांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही.
- **सशुल्क सेवा:** जिल्हा परिषद (शासकीय योजना वगळून), सघन कुक्कुट विकास गट, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, दूध उत्पादक संघ आणि खाजगी संस्थांकडून येणाऱ्या नमुन्यांसाठी नियमानुसार शुल्क आकारले जाते.





**प्रयोगशाळेत केल्या जाणाऱ्या चाचण्या:**

**(Testing Parameters)**

या प्रयोगशाळेत खाद्याची गुणवत्ता तपासण्यासाठी एकूण १५ पेक्षा जास्त घटकांचे (Parameters) वैज्ञानिक विश्लेषण केले जाते:

१. **स्थूल विश्लेषण (Proximate Analysis):** आद्रता (Moisture), प्रथिने (Crude Protein), स्निग्ध पदार्थ (Crude Fat), तंतुमय पदार्थ (Crude Fibre), संपूर्ण राख (Total Ash), सँड सिलिका (Acid Insoluble Ash).

२. **मुख्य खनिजे (Macroelements):** कॅल्शियम (Calcium), स्फुरद (Phosphorus), मीठ (Salt/Sodium), मॅग्नेशियम, पोटॅशियम, सल्फर.

३. **सूक्ष्म खनिजे (Microelements):** तांबे (Cu), कोबाल्ट (Co), मँगनीज (Mn), मॉलिब्डेनम (Mo), लोह (Fe), जस्त (Zn), सेलेनियम (Se).

४. **जड धातू (Heavy Metals):** ॲल्युमिनियम (Al), आर्सेनिक (As), पारा (Hg), शिसे (Pb), कॅडमियम (Cd).

५. **इतर चाचण्या:** बॉम्ब कॅलरीमीटरद्वारे एकूण ऊर्जा (Gross Energy), युरिया (Urea) आणि तंतूचे प्रकार (Fibre Fractions - ADF, NDF, ADL).

## पशुखाद्य विश्लेषणाचे महत्त्व आणि संतुलित आहाराची गरज

### १. गुणवत्ता व सुरक्षिततेची खात्री:

प्रयोगशाळेतील विश्लेषणामुळे खाद्याची पोषणमूल्ये निश्चित होतात. बाजारातील निकृष्ट, भेसळयुक्त किंवा अप्रमाणित पशुखाद्याची ओळख पटवून त्यावर प्रतिबंध घालता येतो. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (BIS) च्या मानकांनुसार गुणवत्ता नियंत्रण राखण्यास मदत होते.

**२. शास्त्रोक्त व संतुलित पशुखाद्य निर्मिती:**

जनावरांचे वय, जात आणि उत्पादन क्षमतेनुसार ऊर्जा, प्रथिने, खनिजे व जीवनसत्त्वांचा योग्य समतोल असणे म्हणजेच संतुलित आहार होय. प्रयोगशाळेच्या अहवालाच्या आधारे 'फीड फॉर्म्युलेशन' (Feed Formulation) केल्यास उत्पादन खर्च कमी होतो, खाद्याचा अपव्यय टळतो व प्राण्यांचे आरोग्य सुधारते.

**३. पशुजन्य उत्पादनांमध्ये वृद्धी:**

सकस पशुखाद्यामुळे दुधाचे उत्पादन आणि गुणवत्ता (Fat व SNF चे प्रमाण) वाढते. तसेच जनावरांची प्रजननक्षमता सुधारून ते वारंवार आजारी पडत नाहीत, ज्यामुळे पशुपालकांच्या औषधोपचारावरील खर्चात मोठी बचत होते.

**लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत ऑनलाईन सेवा, कालमर्यादा व शुल्क**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या २६ सेवांपैकी ६ प्रमुख सेवा या प्रयोगशाळेमार्फत ऑनलाईन पद्धतीने दिल्या जातात. या ६ प्रमुख सेवांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अ. क्र. | देण्यात येणाऱ्या सेवांचा तपशील | कालमर्यादा | निर्धारित शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पशुखाद्यातील पोषक घटकांचे स्थूल विश्लेषण (Proximate analysis: १ ते ६ Parameter) | १५ कामाचे दिवस | रु. ५५०/- |
| २ | पशुखाद्यातील स्थूल घटक (१ ते ६) सह कॅल्शियम, स्फुरद, व मीठ (१ ते ९ Parameter) | २१ कामाचे दिवस | रु. २,०५०/- |
| ३ | पशुखाद्यातील सूक्ष्मपोषक द्रवे व जड धातू (Macronutrients, Micronutrients, & Heavy Metals) | २५ कामाचे दिवस | रु. ५००/- (प्रती धातू) |
| ४ | पशुखाद्यातील तंतू (Crude Fibre, NDF, ADF & ADL) | १२ कामाचे दिवस | रु. १,८००/- |
| ५ | पशुखाद्यातील युरिया | ०७ कामाचे दिवस | रु. ५५०/- |
| ६ | पशुखाद्यातील ऊर्जा (Gross Energy) | ०३ कामाचे दिवस | रु. ४५०/- |

पशुजन्य उत्पादनांची गुणवत्ता व प्रमाण वाढवण्यासाठी, तसेच शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाची आर्थिक कार्यक्षमता उंचावण्यासाठी सकस व संतुलित पशुखाद्य हाच पाया आहे. पशु-पक्षी खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर, पुणे ही संस्था पारदर्शक, अचूक व ऑनलाईन सेवांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पशुपालक, दुग्ध व्यावसायिक व खाजगी संस्थांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व त्यांना समृद्ध करण्यासाठी सातत्याने कटिबद्ध आहे.






संकल्पना- प्रा. डॉ. विवेक देशमुख, माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (पशुप्रजनन शास्त्र ) पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
लेखन- प्रा. डॉ. नितीन मार्कंडेय, माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (पशुप्रजनन शास्त्र ) पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
संकलन, संपादन व सजावट: संतोष पवार, वृत्तसंपादक: महापशुधनवार्ता, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७

पान 2/2

# बाराखडी पशुसंवर्धनाची




## सुदृढ जनावरे, समृद्ध शेतकरी

**ण** ण आणि न मधला फरक ताण असतो



**त** तगमग नको अजीबात उन्हाळ्यात



**थ** थर चढू द्या शेणाचे, मुक्त संचार गोठ्यात



**द** दहा दिवसास करा शरीरवजन नोंद



**ध** धरा पैदास धोरणाची कास



**न** नर वासरे वेगळी सांभाळा



**प** पशुप्रजनन कायदा, गुणात्मक वृद्धीचा फायदा!



**फ** फक्त उत्पादक जनावरे सांभाळा



**ब** बसू द्या दीर्घकाळ, रवंथ करण्यासाठी




**भ** भरलेलीच ठेवा पाण्याची भांडी



**म** मदत मिळवा 1962 टोल फ्री क्रमांकावर




**य** यश दडलय अनुवंशिकता विकासात



**र** रहातात ओल्या गोठ्यात रोगजंतू



**ल** लसीकरणच योग्य करावया रोगप्रतिबंध




**व** वजनवाढ गतिमान हा शुभ संकेत



**श** शरीराचा भार पेलतात योग्य खुरे



**ष** षटकी (६)दिन अंतराने दूध प्रत तपासा



**स** सल्ला शिफारस फक्त पशुवैद्यकाचीच



**ह** हळूच ठेवा गोठ्यात मधूर संगीताचा आवाज



**ळ** ळ तिथे ल नको



सदृढ पशु, अनारोग्य नको

**क्ष** क्षण पशुप्रसुतीचे, सावधानतेचेच



**ज्ञ** ज्ञान वर्धनासाठी गोठ्यात ठेवा ग्रंथ



**निरोगी जनावरे, समृद्ध शेतकरी**

चला, आधुनिक पशुपालन करून समृद्धीचा नवा इतिहास घडवूया!

संकल्पना- प्रा. डॉ. विवेक देशमुख, माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (पशुप्रजनन शास्त्र) पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
लेखन- प्रा. डॉ. नितीन मार्कंडेय, माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (पशुप्रजनन शास्त्र) पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
संकलन, संपादन व सजावट: संतोष पवार, वृत्तसंपादक: महापशुधनवार्ता, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७



महाराष्ट्र शासन

गृह विभाग

# गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करा!

## संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा!

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 48 नुसार गाई व वासरे आणि इतर दुभती जनावरे यांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे.

## मार्गदर्शक सूचना

### 1 कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी

- महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, 1976,
- प्राण्यांना क्रूरतेपासून संरक्षण अधिनियम, 1960 तसेच, इतर आनुषंगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

### 2 बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाई

- महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत तसेच, जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत यांनी अनधिकृत व विनापरवाना कत्तलखाने शोधून त्यांच्यावर नियमोचित कारवाई करावी व असे कत्तलखाने होऊ देऊ नयेत.

### 3 MCOCA अंतर्गत कारवाई

- संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळया किंवा संघटनांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत नियमोचित कारवाई करावी.

### 4 वाहन तपासणी

- अवैधरीत्या गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करून मोटार वाहन अधिनियम व इतर आनुषंगिक कायद्यांनुसार नियमोचित कारवाई करावी.

### 5 नोडल अधिकारी नियुक्ती

- पोलीस, परिवहन व पशुसंवर्धन विभागांनी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावेत. त्यांचे संपर्क क्रमांक संबंधित विभागांना व नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत.

### 6 सीमावर्ती तपासणी नाके

- सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये इतर राज्यातून महाराष्ट्रात प्रवेशाच्या ठिकाणी संयुक्त तपासणी चौक्या स्थापन कराव्यात. (पोलीस, परिवहन, स्थानिक संस्था, पशुसंवर्धन विभाग यांचा समावेश)

### 7 संयुक्त भरारी पथके

- अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखाने यांवर कारवाई करण्यासाठी संयुक्त भरारी पथके स्थापन करावीत.

### 8 Dial 112 वर तक्रार

- गोतस्करी, अवैध वाहतूक किंवा अनधिकृत कत्तलखान्यांबाबत तक्रार केल्यास पोलीस यंत्रणेने तात्काळ कारवाई करावी.

### 9 धार्मिक कारणांसाठी तात्पुरती परवानगी (मुंबई)

- मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 चे कलम 403(2) अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून लेखी परवानगी दिल्यानंतर पशुवधगृह चालविता येईल. मात्र, स्वच्छता, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेचे सव नियमांचे काटेकोर पालन करणे परवानाधारकांवर बंधनकारक राहील.

**जबाबदारी** वरील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी -

पोलीस आयुक्तालय क्षेत्र वगळून इतर ठिकाणी : संबंधित जिल्हाधिकारी

पोलीस आयुक्तालय क्षेत्रात : संबंधित पोलीस आयुक्त

**गोवंशाचे संरक्षण करा, कायद्याचे पालन करा – समाज सुरक्षित करा!**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

# गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत



## मार्गदर्शक सूचना

| शासन परिपत्रक क्रमांक- एमआयएस-0526/प्र.क्र. 56/विशा-1ब | दुसरा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई - 400 032 | दिनांक : 21 मे, 2026 |
| --- | --- | --- |

**प्रस्तावना :-**



भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 48 नुसार गाई व वासरे, तसेच इतर दुभती जनावरे यांच्या जातींचे जतन करणे, जाती सुधारणे व उपयुक्त जनावरांची (विशेषत: गाई व वासरे) कत्तल रोखण्यासाठी योग्य ती पावले उचलणे किंवा कायदे करणे यासाठी शासनाने प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने गोवंशाचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना

1. राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, 1976, प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, 1960 तसेच, इतर आनुषंगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी.



2. संबंधित सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगर पालिका / नगर पंचायत तसेच, सर्व जिल्हा परिषद/ पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने शोधून त्यांच्यावर नियमोचित कारवाई करावी.




3. प्रचलित असलेले कायदे व नियम यांचा भंग करून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या अथवा संघटनांविरुद्ध संबंधित पोलीस यंत्रणेने प्रचलित नियमांनुसार तपास करून महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत नियमोचित कारवाई करावी.



4. राज्यातील परिवहन/वाहतूक विभागाने उपरोक्त प्रमाणे अवैधरीत्या गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करून संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम व इतर आनुषंगिक कायद्यांनुसार नियमोचित कारवाई करावी.



5. राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक कार्यालये, पोलीस आयुक्तालय तसेच पशुसंवर्धन आयुक्तालय व परिवहन आयुक्तालय यांनी त्यांच्या स्तरावरून स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावेत. नियुक्त अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक संबंधित विभागांना व नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत.



6. महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा, परिवहन कार्यालये, नागरी/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, पशुसंवर्धन कार्यालये या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेली सीमा भागावर इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यामध्ये प्रवेशांच्या ठिकाणी संयुक्त तपासणी चौकी स्थापित करावी.




7. राज्यातील सर्व संबंधित विभागांनी संयुक्त भरारी पथके स्थापन करून अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखाने यांवर नियमोचित कारवाई करण्यात यावी.




8. गोवंशाचे जतन व संवर्धन प्रभावीपणे करण्यासाठी डायल 112 या हेल्पलाईन क्रमांकावर गो तस्करी, गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखाने यानुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित पोलीस यंत्रणेने उक्त तक्रारीवर तात्काळ कारवाई करावी.

DIAL
112
आपत्तीतील हेल्पलाईन

9. मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 चे कलम 403(2) अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून धार्मिक कारणास्तव तात्पुरते पशुधारक स्थापन करण्यास लेखी परवानगी दिल्यानंतर पशुधारकाची स्वच्छता ठेवणे, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेसंबंधी सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे परवानाधारकांवर बंधनकारक राहील.




**सर्वांनी नियमांचे पालन करा, गोवंशाचे संरक्षण करा, समाजाचे कल्याण करा !**

**गोवंशाचे संरक्षण – आपली जबाबदारी, आपले कर्तव्य !**

- गोवंशाची अवैध वाहतूक रोखा
- अवैध कत्तलखाने बंद करा
- कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा
- समाजात शांतता व सद्भावना राखा



कायद्याचे पालन करा • शांतता राखा • सुरक्षित समाज घडवा

महाराष्ट्र शासन आपल्या सेवेत

महाराष्ट्र शासन

# पशुसंवर्धन विभाग

पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

## १९६२ हेल्पलाईन व्हॉट्सअॅप चॅटबॉट द्वारे

## राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण




शेतकरी **+91 9063142299** या क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठवून किंवा निश्चित केलेला क्यूआर (QR) कोड स्कॅन करून या चॅटबॉट सेवेचा लाभ घेऊ शकतात.

- पशुधनाचे आजार, उपचार आणि लसीकरणाबाबत माहिती मिळवणे.
- पशुसंवर्धन आणि सरकारी योजनांची सविस्तर माहिती मिळवणे.
- खालील माध्यमांद्वारे पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधणे:
  - चॅट (Chat)
  - ऑडिओ कन्सल्टेशन (व्हॉईस कॉल सल्ला)
  - व्हिडिओ कन्सल्टेशन / टेलिकन्सल्टेशन (व्हिडिओ कॉल सल्ला)



पशुवैद्यकीय चॅटबॉट सेवेसाठी खालील क्यूआर (QR) कोड स्कॅन करा:

**१९६२ हेल्पलाईन** | आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर

निरोगी पशुधन • समृद्ध शेतकरी • समृद्ध महाराष्ट्र